# समर्थ स्थापित
# अकरा मारुती


मसूर


पारगाव


सिंगणवाडी


माजगाव


बहे


चाफळ



उंब्रज


शहापूर


शिराळे


चाफळ


मनपाडळे




१ इंच = सुमारे १० मैल अथवा १६ किलोमीटर

# समर्थ स्थापित अकरा मारुती

लेखक

**पु.वि. हर्षे**

बी.ए., बी.टी., एल्. एल्. बी.

ॲडव्होकेट

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४.

किंमत १५ रुपये

© श्री. पु. वि. हर्षे

पहिली आवृत्ती : १८८३
पुनर्मुद्रणे : १९८९, १९९५, १९९८, २०००
२००१, २००२, २००३, २००४
२००५, २००७, फेब्रुवारी २००९

अक्षरजुळणी : अॅड टाईपसेटर्स
समर्थ सदन, डॉ. डी. डी. साठे मार्ग,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

मुद्रक : आंजनेय धनंजय ढवळे
समर्थ मुद्रणालय
पि.ए.पि/ए-८४, खैरणे,
एम्. आय. डि. सि. नवी मुंबई.

प्रकाशक : ज्योती धनंजय ढवळे
केशव भिकाजी ढवळे
श्री समर्थ सदन, पहिली भटवाडी,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

आपल्या वयाच्या ८४ व्या वर्षी देखील आपल्या उत्साहाने आम्हा मुलांना व नातवंडांना स्फूर्ती देणाऱ्या व तीन पिढ्यांच्या सेवेत आपले आयुष्य खर्ची घातलेल्या माझ्या

पूज्य आईच्या चरणीं

सादर- सप्रेम अर्पण

# आजही बलोपासना आवश्यक आहे

महाराष्ट्रातील गणेशभक्तांच्या मनात 'अष्टविनायकाचे' जे स्थान असते तेच स्थान मारुतीभक्तांच्या मनात समर्थांनी स्थापन केलेल्या अकरा मारुतींचे असते.

समर्थ रामदास स्वामींनी महाराष्ट्रात स्थापन केलेल्या अकरा मारुतींची माहिती देणे हा या पुस्तकाचा उद्देश असला तरी तसे करताना समर्थ रामदासस्वामींचे सविस्तर चरित्र कथन करण्याचा हेतू नाही किंवा मारुतीचे चरित्रही सांगण्याचा हेतू नाही. समर्थांच्या जीवनात मारुतीचे जे स्थान होते ते सांगणे व ते तसे का होते हेही सांगणे हा ह्या पुस्तकाचा एक महत्त्वाचा उद्देश आहे.

तसेच, समर्थांनी मारुती-मूर्तींची स्थापना कोठे कोठे केली, महाराष्ट्रातले त्यांचे विशिष्ट अकरा मारुती कोठे कोठे आहेत, त्यांच्या स्थापनेच्या मागची प्रेरणा कोणती होती, त्या मारुतींच्या स्थापनेच्या संबंधात काही आख्यायिका आहेत काय व असल्यास त्या कोणत्या आहेत, त्या मारुतींच्या मूर्ती कशा आहेत, त्यांची वैशिष्ट्ये कोणती, त्यांच्या मूर्तींची व मंदिरांची देखभाल करण्यासाठी काय व्यवस्था आहे, त्यांची आज स्थिती काय आहे, त्यांच्या दर्शनाला जाण्यासाठी कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत, ह्या व अशा मुद्यांवर महाराष्ट्रातील मारुतीभक्तांना शक्य तितकी माहिती उपलब्ध करून देणे हा देखील या पुस्तकाचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश आहे.

समर्थांनी मारुती उपासनेच्या द्वारा बलोपासनेची जी प्रेरणा त्या काळात मरगळलेल्या महाराष्ट्राला दिली तशीच प्रेरणा आजही महाराष्ट्रातील जनतेला दिली जाणे अत्यंत आवश्यक आहे व त्या दृष्टीने समर्थ-स्थापित अकरा मारुतींची यात्रा लोकप्रिय करणे हे एक अत्यंत उपयुक्त पाऊल ठरेल.

अष्टविनायकांची यात्रा लोकप्रिय झालीच आहे. तशीच समर्थ स्थापित अकरा मारुतींची यात्रा देखील लोकप्रिय होईल व त्या कार्यास ह्या पुस्तकाचा थोडाफार हातभार लागल्यासारखे होईल अशी आशा आहे.

-पु. वि. हर्षे
बी३, अक्षय सोसायटी
जयराजनगर,
वझिरनाका, बोरिवली

# अकरा मारुतींचे अज्ञात महत्त्व

समर्थ रामदासांनी शब्दबद्ध केलेले त्यांचे विचारधन मुद्रणबद्ध करण्याचे सर्वांत मोठे श्रेय संपादन करणाऱ्या ढवळे प्रकाशनचे मालक व माझे ज्येष्ठ स्नेही श्री. धनंजयराव यांच्या विनंतीवरून हा लेखन प्रपंच मांडला आहे. समर्थ वाङ्मय प्रकाशन कार्यात श्री. ढवळे कुटुंबियांचा वाटा फार मोठा असल्याने श्री. धनंजयराव यांची विनंती आज्ञासमान समजून श्री. हर्षे यांच्या या पुस्तकास प्रस्तावना लिहित आहे.

श्री. हर्षे यांचे हस्तलिखित पुस्तक वाचून समाधान वाटले. कारण अशा प्रकारचे पुस्तक प्रसिद्ध होणे ही काळाची गरज होती. पूर्वी समर्थ सेवा मंडळाने अकरा मारुती ही पुस्तिका छापली होती. सध्या अकरा मारुतींची माहिती देणारे एकही पुस्तक बाजारात नाही. या पार्श्वभूमीवर श्री. हर्षे यांचे हे पुस्तक प्रसिद्ध करणे फार मौलिक ठरणार आहे. अष्टविनायकाप्रमाणे 'अकरा मारुती' ची यात्रा प्रसिद्ध व लोकप्रिय व्हावी हा या पुस्तकामागे लेखकाचा प्रधान उद्देश दिसतो. पुस्तकाची मांडणी सुरेख झाली आहे. संक्षिप्त समर्थ चरित्र, समर्थ व मारुती यांची तुलना, भीमरूपी स्तोत्र सिद्ध करण्याची पद्धती, मारुती-मंदिरे स्थापण्यापाठीमागील प्रेरणा ही प्रकरणे मूळ विषयाला पूर्णतः धरून नसली तरी मूळ विषयाचे आकलन होण्यास सहाय्यभूत ठरणारी निश्चितच आहेत. शेवटी सर्व मारुती-मंदिरांची नावे, भौगोलिक स्थान, जाण्याचा मार्ग, सध्याची अवस्था या गोष्टी फारच महत्त्वपूर्ण असून आज ज्याला या अकरा मारुतींचे दर्शन घ्यावयाचे आहे त्या पांथस्थाला निश्चितच पथप्रदर्शक ठरतील. त्या त्या मारुती मंदिराचा इतिहास व त्या स्थानाशी किंवा मूर्तीशी निगडीत असलेल्या आख्यायिका देऊन लेखकाने विषयाची रुक्षता घालवून त्यात गोडवा निर्माण केला आहे. एरवी एखाद्या 'टुरिस्ट गाईड' सारखे त्याचे स्वरूप झाले असते. परंतु मराठी वाचकांचे मानसशास्त्र श्री. हर्षे यांनी अचूक ओळखून त्या त्या स्थानासंबंधी उपलब्ध असलेल्या आख्यायिका यथायोग्य पेरल्या आहेत. पुस्तक वाचून झाल्यावर 'एकदा या सर्व मारुतींची दर्शने घेऊन यावे' असा संकल्प प्रत्येक वाचक सोडीलच असा मला विश्वास वाटतो. तेव्हा प्रारंभी लेखकाने व्यक्त केलेला उद्देश हीच या पुस्तकवाचनाची फलश्रुती ठरेल असे वाटते अन् ती ठरावी.

मारुतीची मंदिरे ठिकठिकाणी स्थापन करून हिंदू समाज संघटित व सामर्थ्यशाली बनवावा हा त्यांचा प्रधान हेतू होता. स्वामी विवेकानंदांनी सुद्धा रामकृष्ण आश्रमाद्वारे धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले तेव्हा बेलूर मठात मारुतीची स्थापना करून "करा बरे सर्वत्र त्या महावीर हनुमानांची पूजा. सारे राष्ट्र कसे निर्वीर्य, चेतनाहीन बनले आहे." असा संदेश दिला. समर्थांनी सुद्धा समाजाचे ओज, अस्मिता आणि अभिनिवेश अभंग आणि अखंड असावे, वर्धिष्णू व्हावे म्हणून विविध मारुती-मंदिरे स्थापन केली. हिंदूनी राष्ट्र म्हणून जगण्यासाठी सामर्थ्यशाली होणे रामदासांना आवश्यक वाटले. म्हणून त्यांनी स्थापन केलेले बहुसंख्य मारुती वीररूप किंवा प्रतापरूप धारण केलेले आहेत. फक्त राममूर्तीच्या समोरील मारुती दास्यभाव धारण करून उभा आहे.

समर्थांनी मारुतीची शेकडो मंदिरे स्थापना केली असताना या अकरा मारुतींना विशेष महत्त्व का? या कोड्याचा स्वच्छ निर्देश समर्थ वाङ्मयात कोठेही नाही. त्यामुळे समर्थांच्या गुप्त राजकारणाचे हे 'अकरा मारुती' साक्षीदार असावेत आणि म्हणून त्यांचे वेगळेपणाचे कारण अज्ञात राहिले असावे. सन १६७४ मध्ये शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाला तेव्हा समर्थांनी लिहिलेल्या "आनंदवनभुवनी" या काव्यातील खालील कडवे या अकरा मारुतींशी संबंधीत असावे असे मला नेहमी वाटते-

अकरा अकरा बहु अकरा । माय अकरा कळेचिना
गुप्त ते गुप्त जाणावे । आनंदवनभूवनी ॥

सन १६३१ मध्ये शहाजी राजे व समर्थ रामदास यांची टाकळी (नासिक) येथे पुरश्चरण संपताना झालेली भेट, १६४५ मध्ये भारत प्रवास संपल्यावर समर्थांचे शहाजी राजेंच्या जहागिरीत आगमन, त्याच वर्षी शिवाजी राजेंचे तोरणा व राजगड किल्ले घेणे व शहाजी राजेंच्या जहागिरीतच असलेल्या गावांमध्ये समर्थांनी केलेले हे अकरा मारुती यांचा समर्थांच्या राजकीय जीवनाच्या प्रारंभाशी घनिष्ठ संबंध आहे व म्हणून 'आनंदभुवनी'मधे या अकरा मारुतींचाच अत्यंत सावधपणे सांकेतिक निर्देश समर्थांनी केला असावा असे वाटते. 'राजकारण बहुत करावें । पण कळोचि नेदावें ॥' या राजकीय तत्त्वानुसार या अकरा मारुतींचे तत्कालीन राजकीय कार्य कोणते याचा मराठी मनाने शोध घ्यावा.

समर्थभक्त सुनील चिंचोलकर,
कार्यकारी संपादक, सज्जनगड मासिक,
मु. पो. सज्जनगड, (जि. सातारा)

# 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥'

पवित्र गोदामाईच्या काठचे जांब हे गाव समर्थ रामदासांचे जन्मस्थान. वडिलांचे नाव सूर्याजीपंत, आडनाव ठोसर. आईचे नाव राणूबाई. रामदासांचे पाळण्यातले नाव नारायण. रामदास हे त्यांच्या आईवडिलांचे द्वितीय पुत्र. पहिल्या पुत्राचे नाव गंगाधर.

सूर्याजीपंत हे गावचे कुळकर्णी होते. आदिलशाहीचे ते नोकर होते, परंतु उदरनिर्वाहासाठी ते हे काम करीत. त्यांचे काम चोख असे.

सूर्याजीपंतांच्या घराण्यात कित्येक पिढ्यांपासून श्रीरामाची उपासना चालू होती. सूर्याजीपंत स्वतः सूर्याचीही अत्यंत कडक उपासना करीत. राणूबाईदेखील मोठ्या देवभक्त होत्या.

सूर्याजीपंताच्या प्रखर भक्तीने सूर्यदेव प्रसन्न झाले. त्यांनी ब्राह्मणाच्या वेषात सूर्याजीपंताना दर्शन दिले व म्हटले, "तुमच्या भक्तीने प्रसन्न होऊन मी ब्राह्मणवेषात तुमच्यासमोर प्रगट झालो आहे. माझा तुम्हाला आशीर्वाद आहे. मी तुम्हाला वर देतो की तुम्हाला दोन पुत्र होतील. पहिला पुत्र माझा अंश असेल व तो वंशाचा आधार होईल. दुसरा पुत्र मारुतीचा अंश असेल व तो आजन्म ब्रह्मचारी राहून जगाचा उद्धार करील. एकाचे वास्तव्य गंगातीरी राहील व दुसऱ्याचे कृष्णातीरी राहील."

सूर्यदिवाच्या वरदानाप्रमाणे राणूबाईला दोन पुत्र झाले. पहिला पुत्र सूर्याचा प्रसाद व दुसरा पुत्र मारुतीचा अंश हा रामभक्तीचा प्रसाद, असे सूर्याजीपंत व राणूबाई मानीत.

शके १५३० च्या रामनवमीला रामजन्माच्या वेळी मध्यान्हीला दुसऱ्या पुत्राचा म्हणजे आपल्या नारायणाचा जन्म झाला. "ह्या पुत्राच्या कुंडलीत आत्माराम महर्दशेत ६६ वर्षे हनुमान अंदर्दशा लाभली आहे" असे जन्मकुंडली मांडणाऱ्या ज्योतिषीबुवांनी सांगितले!

वडील बंधू गंगाधर हे नारायणापेक्षा तीन वर्षांनी मोठे. हे पुढे मोठे विद्वान म्हणून मान्यता पावले. लोक त्यांना 'श्रेष्ठ' ह्या नावाने संबोधीत.

नारायणाची प्रकृती सुदृढ, निरोगी होती. छोटा नारायण जसजसा वाढू लागला तसतशा त्याच्या खोड्या वाढू लागल्या. घरात क्षणभर टिकायचा नाही. झाडावर चढायचं, नदीत डुंबायचं, गोट्या खेळायच्या, अवघड जागी चढून बसायचं, वाटेल तिथून उड्या मारायच्या, असा त्याचा द्वाडपणा सतत चालू असायचा. अभ्यासाला वडिलांनी जबरदस्तीनं बसवायचं. पण नारायणाची बुद्धी अशी तीव्र, की एखादी गोष्ट वडिलांनी शिकवली की क्षणात ती पाठ. लगेच दुसऱ्या क्षणी पळाला उनाडक्या करायला.

सहाव्या वर्षी नारायणाची मुंज झाली. तोपर्यंत नारायणानं वडिलांनी शिकविलेला रुद्र, समासचक्र, रूपावली, पूजा, वैश्वदेव वगैरे सगळं पाठ करून ठेवलं होतं.

मुंज झाल्यावर नारायण वडिलांना म्हणाला, 'बाबा, आता मला अनुग्रह द्या.' वडील म्हणाले " बाळ, अजून तू लहान आहेस, पुढं बघू." नारायण हिरमुसला झाला.

त्यानंतर दोन वर्षांनी सूर्याजीपंतांचे निधन झाले.

नारायण आता वडील बंधूंच्या मागे लागला व अनुग्रह (गुरुमंत्र) मागू लागला. "अजून तू लहान आहेस" असे म्हणून त्यांनीही त्याला धुडकावून लावलं.

आता नारायण चिडला. वडिलांनी गुरुमंत्र दिला नाही आणि आता वडील बंधूही गुरुमंत्र देत नाहीत, तर आता आपण मारुतीरायाचेच पाय धरू व त्याच्याचकडून गुरुमंत्र घेऊ असे ठरवून तो गावाबाहेरच्या मारुतीच्या देवळात धावत गेला. त्याने मारुतीच्या पायांवर डोके ठेवले व आता गुरुमंत्र मिळाल्याशिवाय येथून हलणार नाही असा निर्धार केला. शेवटी मध्यरात्रीच्या सुमारास मारुतीरायांनी त्याला दर्शन दिले आणि त्याला मंत्र दिला, 'श्रीराम जयराम जय जय राम॥' आणि यापुढे तुझे नाव 'रामदास'; असा आदेश दिला व मारुतीराय अंतर्धान पावले.

इकडे नारायणाच्या घरची मंडळी दिवसभर त्याचा शोध करून थकली होती व अत्यंत काळजीत होती. इतक्यात 'श्रीराम जयराम जय जय राम' असा घोष करीत अतीव आनंदाने बेहोष झालेली नारायणाची स्वारी धावत आली. सर्वांचा जीव भांड्यात पडला. नारायणाने देवळात घडलेली हकीगत त्यांना सांगितली तेव्हा त्यांना अद्भुत वाटले व आनंदही झाला.



आता नारायणाची वृत्ती पालटली. उनाडक्या संपल्या. तो गंभीर झाला. रोज बराच वेळ ध्यानस्थ बसू लागला. देवाची भजने करायला लागला व ती गाऊ लागला. नारायणाच्या आईला आता चिंता वाढू लागली. ह्या मुलाचे घरातल्या व्यवहाराकडे लक्ष नाही हे पाहून तिला वाईट वाटायचे. शेवटी तिने ठरवले की नारायणाचे आता लग्न करून टाकायचे, म्हणजे तो सरळ मार्गावर येईल; संसारात पडला की घराकडे आपोआप त्याचे लक्ष लागेल.

पण लग्नाचा विषय तिने नारायणाकडे काढला की तो चवताळायचा. एकदा तर तिने हा विषय काढल्यावर तो पळून गेला आणि नदीकाठच्या एका उंच झाडावर चढून बसला.

"खाली उतर" आईची आज्ञा.

" तू माझ्या लग्नाचा विषय पुन्हा काढणार नाहीस असे मला वचन दे, तर खाली उतरेन" नारायण झाडावरून ओरडून म्हणाला.

"कसा उतरत नाही ते पाहाते" असे म्हणून एका दणकट माणसाला तिने नारायणाला जबदस्तीने खाली उतरवायला झाडावर पाठविले. तो माणूस जवळ येत आहे असे दिसताच नारायणाने झाडाच्या शेंड्यावरून सरळ खाली नदीत उडी टाकली. सगळीजणं आता घाबरली. परंतु नारायण सुखरूप बाहेर आला- डोक्याला टेंगुळ आले, ते आयुष्यभर कायम टिकले.

आईला फार वाईट वाटले. काही दिवस असेच निघून गेले. आईचा लग्नाचा आग्रह काही कमी होईना आणि नारायण लग्नाला काही तयार होईना. शेवटी "लग्नात अंतरपाट धरीपर्यंत तरी तू पळून जाणार नाहीस असं वचन दे" असं आईने वचन मागितलं आणि नारायणाने आईला तसे वचन दिले.

लग्नाची जोरात तयारी झाली, लग्नाचा दिवस उजाडला. मुंडावळ्या बांधून नारायण बोहल्यावर चढला. "शुभ लग्न सावधान" असे भटजींनी म्हणताच, "कशाबद्दल सावधान?" असे नारायणाने त्यांना विचारले. तेव्हा "आता संसाराची बेडी पायांत पडत आहे तेव्हा सावध व्हा असा ह्या 'सावधान' शब्दाचा अर्थ आहे" असे भटजींनी त्यांना सांगितले.

नारायणाने मुंडावळ्या तोडून फेकून दिल्या आणि तो बोहल्यावरून उतरून धूम पळत सुटला. पुष्कळ शोधाशोध झाली, पण नारायण कोठेही सापडला नाही.

नारायण बोहल्यावरून पळाला तो कित्येक गावे पायी तुडवीत तुडवीत नाशिकजवळील पंचवटीला आला. वाटेत सतत मारुतीचे स्मरण आणि 'श्रीराम जयराम जय जय राम' ह्या जप करीत होता. पंचवटीला येऊन त्याने तेथील रामाच्या मूर्तीच्या पायावर डोके ठेवले आणि 'श्रीराम जयराम जय जय राम' ह्या मंत्राच्या तेरा कोटी जपाचा संकल्प सोडला.

पंचवटीपासून जवळच असलेल्या टाकळी येथील नदीकाठच्या एका गुहेत तो राहू लागला. तेथे गोदावरी आणि नंदिनी या नद्यांचा संगम झालेला होता व तेथे नदीवर घाट होता. त्यांची तपश्चर्या सुरू झाली. रोज पहाटे उठून संगमाच्या ठिकाणी घाटाजवळ कमरभर पाण्यात उभे राहून दोन प्रहरपर्यंत 'श्रीराम जयराम जय जय राम' हा त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप करायचा असा त्याचा निर्धार असे. तासन् तास पाण्यात उभे राहिल्यामुळे कमरेच्या खालच्या भागाला मासे आणि नदीतले इतर प्राणी चावे घेत, पण नारायण निश्चलपणे जप करीत राही. लोकही आता त्याला 'रामदास' ह्या नावाने ओळखू लागले. रोज दोन प्रहरपर्यंत जप करायचा, नंतर घाटावर थोडा वेळ ध्यान करावयाचे, नंतर गावात माधुकरी मागून आणायची, रामाला नैवेद्य करायचा व स्वतः भोजन करायचे, त्यानंर पुराण श्रवण करायचे किंवा स्वतः शास्त्राचे अध्ययन करायचे. आणि रात्री विश्रांती घ्यायची. असा त्यांचा दिनक्रम सुरू झाला. वेद, रामायण, महाभारत, गीता, भागवत, उपनिषदे वगैरे ग्रंथांचा ह्या काळात त्यांनी कसून अभ्यास केला.

रामदासांच्या तपश्चर्येला आता तीन वर्षे होऊन गेली. एके दिवशी ते जप संपवून ध्यानस्थ बसले असता, तेथे आलेल्या एका स्त्रीने त्यांना कोणी तरुण 'योगी' समजून नमस्कार केला. तिच्या कंकणांचा आवाज ऐकून रामदासांनी डोळे न उघडताच "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" असा आशीर्वाद दिला. तेव्हा त्या स्त्रीने विचारले, "कोणत्या जन्मी हा तुमचा आशीर्वाद खरा होणार? ह्या की पुढल्या?" रामदासांनी चमकून डोळे उघडले. तेव्हा त्या स्त्रीबरोबर आलेल्या मंडळींनी रामदासांना सांगितले की, "येथून जवळच दशपंचक म्हणून गाव आहे. त्या गावच्या गिरिधरपंत कुळकर्णी ह्या तरुण व सुसंपन्न माणसाचा नुकताच मृत्यू झाला असून त्याची तरुण विधवा सती जाण्यासाठी आली आहे व ती तुमचा आशीर्वाद मागत आहे."

रामदासांनी मनोमन प्रभु रामचंद्रांची प्रार्थना केली व म्हटले, "भक्तवत्सला रामा, आता तुझीच परीक्षा आहे, तुझ्या भक्ताची सत्त्वपरीक्षा आहे, तेव्हा कृपा



कर." त्यांनी गिरिधरपंताचा मृतदेह जवळ आणण्यास त्या मंडळींना सांगितले. प्रभु रामचंद्रांचे आर्त स्मरण करून त्यांनी त्या प्रेतावर गंगोदक शिंपडले. त्याबरोबर गिरिधरपंत 'रामराम' म्हणत झोपेतून जागे झाल्यासारखे उठून बसले. रामदासांनी त्यांना व त्यांच्या पत्नीला आशीर्वाद दिला की " तुम्हाला आठ ऐवजी दहा पुत्र होतील," रामदासांच्या सिद्धिसामर्थ्याची प्रशंसा करीत सर्व मंडळी आनंदाने परत गेली.

रामदासांचा आशीर्वाद खरा ठरला. पुढल्याच वर्षी गिरिधरपंताच्या पत्नीने पुत्राला जन्म दिला. हा पुत्र रामदासांचा प्रसाद म्हणून त्या जोडप्याने तो पुत्र रामदासांना अर्पण केला. रामदासांनी त्या मुलाचे नाव 'उद्धव' ठेवले. हाच पुढे रामदासांच्या शिष्योत्तमांपैकी एक झाला व 'उद्धवस्वामी' म्हणून प्रसिद्धीस आला.

रामदासांच्या तपःसाधनेची आणि त्यांना प्राप्त झालेल्या सिद्धिसामर्थ्याची हळूहळू सर्वत्र प्रसिद्धी होऊ लागली. रामदासांनी टाकळी येथे नित्यनेमाने जप करून आपल्या तेरा कोटी जपाचा संकल्प बारा वर्षांत पूर्ण केला. लोक आता त्यांना 'रामदासस्वामी' म्हणून ओळखू लागले. बारा वर्षांच्या ह्या काळात रामदासांनी अनेक ग्रंथांचे पठण केले, रामभक्तांचा संग्रह केला, शिष्य जमविले आणि सिद्धिसामर्थ्य प्राप्त केले.

रामदासांचा त्रयोदशाक्षरी राममंत्राचा जप चालू असतांना टाकळी येथे नदीच्या घाटावर हनुमान रोज एका माकडाच्या रूपाने येऊन तो जप ऐकत बसत असे. रामदासांचा तेरा कोटींचा जप पूर्ण झाला तेव्हा त्यांच्या रामभक्तीने अत्यंत आनंदित होऊन मारुतीने रामदासांना आपल्या अक्राळविक्राळ भीमरूपात प्रत्यक्ष दर्शन दिले न आनंदतिशयाने त्यांना मिठी मारली अशी एक कथा आहे. मारुतीचे हे प्रचंड व दिव्य रूप पाहून रामदासांच्या तोंडून मारुतीच्या स्तुतीवर असे एक स्तोत्र उत्स्फूर्तपणे बाहेर पडले. ते 'भीमरूपी स्तोत्र' म्हणून प्रसिद्ध आहे. रामनामांच्या प्रत्येक कोटी जपाला एक ह्याप्रमाणे तेरा कोटी जपासाठी तेरा श्लोक ह्या स्तोत्रात आहेत. त्यापुढे दोन श्लोक स्तोत्राची फलश्रुती सांगणारे व आणखी दोन श्लोक प्रार्थनास्वरूपाचे आहेत. असे हे एकूण सतरा श्लोकांचे स्तोत्र रामदासांच्या मारुतीस्तोत्रांत सर्वश्रेष्ठ मानले जाते.

आता रामदासांचे वय २४ वर्षांचे झाले होते. आता त्यांनी संबंध भारतातील तीर्थक्षेत्रांना भेट देण्याचे ठरविले. तीर्थाटनाला निघण्यापूर्वी त्यांनी

त्यांच्याबरोबर तेथे राहात असलेला शिष्य उद्धव याच्या उपासनेसाठी प्रताप-मारुतीची एक गोमयाची (गाईच्या शेणाची) मूर्ती तयार केली व तिची प्रतिष्ठापना करून दिली. समर्थांनी स्थापिलेली ही मारुतीची पहिली मूर्ती. भारतातील तीर्थक्षेत्रांची यात्रा त्यांनी पायीच केली. कितीही हालअपेष्टा सोसाव्या लागल्या तरी त्यांनी पर्वा केली नाही. हिमालयातील बदरीनारायण-केदारेश्वर येथील श्वेतमारुतीपासून तो थेट दक्षिणेला रामेश्वरापर्यंत त्यांनी पायी भ्रमण केले व एकही तीर्थक्षेत्र भेट दिल्यावाचून सोडले नाही. अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी त्यांनी मारुतीच्या मूर्ती स्थापन केल्या. अनेक ठिकाणी मारुतीमंदिरे उभारून मठांची स्थापना केली व प्रत्येक मठावर आपल्या एकेका शिष्याची नेमणूक केली.

ह्या तीर्थाटनाच्या निमित्ताने रामदासांना संबंध भारतातली त्यावेळची परिस्थिती न्याहाळायला मिळाली. प्रत्येक तीर्थक्षेत्रावरील, तसेच भ्रमंतीमध्ये वाटेत लागणाऱ्या इतरही कित्येक ठिकाणच्या अनेक लोकांशी त्यांचा परिचय झाला. त्यांना अनेक शिष्य मिळाले. हिंदू समाजाची दैन्यावस्था त्यांना दिसली. त्यावेळी संबंध भारतात यावनी सत्तेचा (मुस्लिम सुलतानांच्या सत्तेचा) पाया रुजला होता. हिंदू समाजावर अत्याचार होत होते. हिंदूंची देवालये नष्ट, भ्रष्ट होत होती. कोणाही हिंदूंच्या जीविताची वा मालमत्तेची शाश्वती नव्हती. हिंदूंच्या बायका पळवून नेऊन भ्रष्ट केल्या जात होत्या. आणि हा सर्व जुलूम आणि अन्याय हिंदू समाज लाचारीने, अगतिकतेने सहन करीत होता. हे सर्व पाहून रामदासांचे अंतःकरण व्यथित होई. हिंदू समाजाची ही स्थिती कशी सुधारावी ही तळमळ त्यांना सतत लागून राहिली होती.

रामदासांनी ठरविले की ह्या परिस्थितीतून हिंदू समाजाला बाहेर काढण्यासाठी रामभक्तीच्या नादी लावले पाहिजे. 'दुर्जनांचा संहार करणारा आणि भक्तजनांचे रक्षण करणारा राम' हिंदू समाजाचे मुसलमानांच्या अत्याचारापासून नक्कीच रक्षण करील, रामभक्तीचा प्रसार, करण्याचे हे कार्य 'रामदास' जो मारुती तोच चांगल्या तऱ्हेने करील आणि म्हणून लोकांना मारुती-उपासनेला प्रवृत्त केले पाहिजे. शिवाय मारुती उपासनेच्या योगाने लोकांमध्ये बलोपासनाही वाढीस लागेल व चैतन्य संचरेल, असा विचार रामदासांनी केला. रामदासांनी सर्व शक्तिमान रामालाच 'समर्थ' म्हटले आणि 'समर्थ-भक्तीच्या' प्रसाराचे कार्य सुरू केले. ह्यासाठी त्यांनी जागोजागी रामाची देवळे स्थापन केली, मठ स्थापन केले आणि प्रत्येक मठाची जबाबदारी आपल्या एकेका शिष्यवराकडे सोपविली.



ठिकठिकाणी मारुतीच्या मूर्तींची स्थापना केली. त्यांनी स्वतः अविरत भ्रमण करून कीर्तनाच्या द्वारा लोकांना जागृत केले व रामभक्तीचे आणि मारुती भक्तीचे महत्त्व लोकांना पटवून देण्याचा जणू एक कार्ययज्ञच सुरू केला. प्रत्येक मठाधिपती शिष्याने त्या मठाशी संबंधित देवळाची व्यवस्था पाहावी, आजूबाजूच्या गावांत फिरून लोकांची मने धर्माचरणाकडे, रामभक्तीकडे व हनुमद्-उपासनेकडे आकर्षित करावी, स्वतः ब्रह्मचारी व व्रती राहून भिक्षा मागून स्वतःचा उदरनिर्वाह करावा, भिक्षा स्वतःपुरतीच घ्यावी, धनधान्याचा साठा करू नये, अशा प्रकारचे कडक नियम त्यांनी घालून दिले. त्यांनी जिकडेतिकडे रामजन्माचे व हनुमान जयंतीचे उत्सव सुरू केले व लोकांचे लक्ष रामभक्तीकडे आणि हनुमानभक्तीकडे आकर्षित केले.

रामदासांनी श्रीरामाला लावलले 'समर्थ' हे बिरुद आता लोक त्यांनाच लावू लागले व त्यांना 'समर्थ रामदास स्वामी' ह्या नावाचे ओळखू लागले. त्यांच्या चर्येवरचे अनुपम तेज व वाणीची प्रसन्नता लोकांना त्यांच्याकडे सहज आकर्षित करून घेई. त्यांची वाणी ओघवती होतीच, तिला आता ज्ञान, बहुश्रुतता आणि विशाल अनुभव यांची जोड मिळाली. त्यांच्या तपःसाधनेमुळे आता त्यांना सिद्धि-सामर्थ्यही प्राप्त झाले होते. व त्यामुळे चमत्कार करून दाखविण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी निर्माण झाले होते. त्यांना अंतर्ज्ञानही प्राप्त झाले होते. आपण अंगीकारलेल्या कार्याची असीम तळमळ त्यांच्या ठिकाणी होती. 'आपण समर्थांचे म्हणजे प्रभु रामचंद्राचे सेवक आहोत, म्हणजेच दुष्टांचे निर्दालन करून रामराज्य आणणाऱ्या शक्तीची आपल्यावर कृपा आहे, तेव्हा आम्हा समर्थ-सेवकांचे कोण काय वाईट करू शकणार आहे?' असा दुर्दम्य आत्मविश्वासही त्यांच्या नसानसांतून प्रगट होत होता.

'समर्थाचिया सेवका वक्र पाहे,
असा सर्व भूमंडळी कोण आहे?'

अशा बुलंद शब्दांत त्यांनी लोकांच्या मनातही तोच आत्मविश्वास ठसविला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे आणि त्यांच्या शिकवणुकीच्या उपयुक्ततेमुळे प्रचंड शिष्यसमुदाय त्यांच्याकडे आकर्षित झाला आणि 'धर्माला आलेली ग्लानी' नाहीशी करण्यासाठी हनुमानानेच त्यांच्या रूपाने अवतार घेतला आहे असे लोक मानू लागले. त्यांच्या कार्याची प्रसिद्धी महाराष्ट्रात जिकडे तिकडे झपाट्याने होऊ लागली.

तीर्थाटनाने संपूर्ण भारत पालथा घातल्यानंतर समर्थ रामदासांनी आपले मुख्य कार्यक्षेत्र चाफळखोऱ्यात कृष्णातीरी स्थापावयाचे ठरविले. कारण टाकळी येथे त्यांची तपश्चर्या चालू असल्यापासूनच राम व हनुमान हे त्यांना वारंवार दर्शन देऊन 'कृष्णातीरी जगदुद्धाराचे कार्य कर' असा त्यांना आदेश देत होते. तपश्चर्या पूर्ण व्हावी व तीर्थाटनही पूर्ण व्हावे म्हणून समर्थ रामदासांनी ह्या आदेशाचे पालन राम व हनुमान यांच्या संमतीने आतापर्यंत तहकूब केले होते.

आपल्या सिद्धि-सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी शहापूरच्या बाजीपंत कुलकर्ण्यांची आदिलशाही पेचातून सुटका करून दिली व त्यामुळे बाजीपंतांनी व त्यांच्या पत्नी सतीबाईंनी तर समर्थ रामदासांचे दर्शन झाल्याशिवाय भोजन घ्यावयाचे नाही असा नियम केला. परंतु समर्थांच्या सततच्या भटकंतीमुळे सतीबाईंना दिवसानुदिवस उपास घडू लागले. तेव्हा समर्थांनी शहापूर येथे सतीबाईंसाठी मारुतीची चुन्याची एक मूर्ती बनवून मारुतीमंदिर स्थापून दिले व "ह्या मारुतीचे दर्शन घेतलेत म्हणजे माझे दर्शन झाले असे समजून तुम्ही रोज भोजन घेत जा" असे त्यांना समर्थांनी सांगितले. समर्थांनी महाराष्ट्रात स्थापन केलेले जे अकरा मारुती प्रसिद्ध आहेत त्यांत शहापूरचा हा मारुती कालानुक्रमाने पहिला मानला जातो. *

यानंतर समर्थ रामदासस्वामींनी महाराष्ट्रात सर्वत्र फिरून कीर्तने, प्रवचने करून लोकांना रामभक्तीकडे आणि हनुमानभक्तीकडे व बलोपासनेकडे प्रेरित केले, ठिकठिकाणी मारुतीच्या मूर्तींची स्थापना केली. 'मारुती हे रामभक्तीचे प्रवेशद्वार' अशी त्यांची श्रद्धा होती.

अनेक ठिकाणी अशा मूर्ती स्थापन करता करता, समर्थांनी कृष्णातीरावरील चाफळ या गावी आपल्या शिष्यसमुदायांच्या व गावकऱ्यांच्या श्रमदानाच्या जोरावर एक राममंदिर बांधण्याचे ठरविले. मंदिर बांधून पूर्ण होत आले तरी रामाची मनासारखी मूर्ती समर्थांच्या नजरेस पडेना. समर्थांना मनोमन खात्री वाटत होती की प्रभुरामचंद्रच स्वतः आपल्याला दर्शन देतील व आपल्याला मूर्ती मिळेल. त्यांनी रामाचा धावा सुरू केला. राम प्रसन्न झाले. त्यांनी समर्थांना दृष्टान्त दिला की "येथून जवळच अंगापूर येथील कृष्णेच्या डोहात माझी कोणालाही माहीत नसलेली ब्रह्मकृत मूर्ती डोहातून काढून त्या मूर्तीची स्थापना

* ह्या अकरा मारुतींची संपूर्ण माहिती स्वतंत्र प्रकरणात पुढे दिली आहे.



करावी." मारुतीनेही प्रगट होऊन सांगितले की " रामासमोर माझी मूर्ती स्थापन करून तीत तूं संचार कर आणि मंदिराच्या पाठीमागे माझी प्रताप-मूर्ती स्थापन कर. " समर्थांचा आनंद गगनात मावेना !

दृष्टान्त झाल्याप्रमाणे समर्थांनी अंगापूर येथील डोहात बुडी मारली व डोहात त्यांना दृष्टान्तातील वर्णनाप्रमाणे असलेली प्रभुरामचंद्रांची मूर्ती मिळाली. त्यांना तेथे रामाच्या मूर्तीजवळ महिषासुरमर्दिनी देवीचीही मूर्ती मिळाली. त्यांनी त्या मूर्ती बाहेर काढल्या व त्या घेऊन ते चाफळला येऊ लागले. परंतु आपल्या गावच्या डोहातील मूर्ती काढून त्या दुसऱ्या गावाला नेल्या जात आहेत असे गावकऱ्यांना कळल्याबरोबर त्यांनी समर्थांना गाठले व म्हटले, "आमच्या गावचा देव दुसऱ्या गावात न्यायचा नाही, त्याची स्थापना आमच्याच गावात झाली पाहिजे." त्यांनी समर्थांना अडविले. समर्थ म्हणाले,"बाबानो, ह्या मूर्ती तुम्हा गावकऱ्यांना माहीत नव्हत्या. आणि देव काय कोणा एकाच गावाचा असतो का?" परंतु गावकरी ऐकेनात. तेव्हा समर्थांनी अंगापूर गावच्या वेशीवर त्या मूर्ती ठेवल्या व ते त्या लोकांना म्हणाले, "ठीक आहे, देव येत असेल तुमच्या बरोबर, तर घेऊन जा त्याला." एवढे म्हणून समर्थ सरळ चाफळ गावी आले. इकडे गावकरी त्या मूर्ती उचलून नेण्याचा प्रयत्न करू लागले तो त्या मूर्ती जागच्या हालेनात. गावकऱ्यांनी खूप प्रयत्न केले, परंतु त्या मूर्ती तेथून हलविणे त्यांना शक्य झाले नाही. त्यांना आपली चूक कळून आली. आता देवाचा आपल्यावर कोप होईल अशी त्यांना भीती वाटू लागली ते धावत चाफळला आले आणि समर्थांच्या पाया पडून त्यांनी समर्थांची क्षमा मागितली. मग समर्थांनी त्या मूर्ती आणल्या व बांधून तयार झालेल्या देवळात श्रीरामाच्या मूर्तीची मोठ्या थाटामाटात प्रतिष्ठापना केली. मोठ्या थाटात उत्सव केला. ह्या उत्सवाला अनेक लोकांनी उत्स्फूर्त हातभार लावला. शिवाजी महाराजांच्या कानावरही ह्या मूर्तीच्या स्थापनेची व उत्सवाची हकीगत गेली, तेव्हा त्यांनीही त्या उत्सवासाठी तीनशे होन पाठविले.

ह्या वेळेपर्यंत शिवाजी महाराज व समर्थ रामदास स्वामी ह्या दोघांची प्रत्यक्ष भेट झालेली नव्हती, पण समर्थांची कीर्ती महाराजांच्या कानांवर गेलेली होती, साधुसंताचा आदर करावा, त्यांचे आशीर्वाद नेहमी आपल्या पाठीशी असावेत, अशी शिकवण शिवाजीमहाराजांना त्यांच्या बाळपणापासूनच त्यांच्या आईकडून व गुरुवर्यांकडून मिळालेली होती. हिंदवी स्वराज्याचे जे कार्य त्यांनी चालविले

होते. त्याला पोषक असेच कार्य समर्थांच्या हातून घडत होते. अन्यायाचा प्रतिकार करणे, त्यासाठी स्वतःचे सामर्थ्य वाढविणे, आपल्या आयाबहिणींवर यवनांकडून होणारे अत्याचार निपटून काढण्यासाठी जनतेला प्रेरित करणे व सज्ज करणे. दुष्ट, जुलमी परकीय राजवट नष्ट करून स्वधर्माचे स्वराज्य-सुराज्य-रामराज्य आणणे, हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून आणि 'हीच श्रींची इच्छा आहे' अशा श्रद्धेने शिवाजीमहाराज कार्य करीत होते. समर्थांची शिकवणही त्याच काळात ह्याच कार्यासाठी महाराष्ट्रातील मरगळलेल्या जनतेला प्रेरित करीत होती. 'रामराज्य' हेच दोघांच्याही कार्याचे इष्ट फलित होते. फरक इतकाच होता की शिवाजी महाराज हे कार्य राजकीय डावपेचांच्या द्वारा, शस्त्रांच्या साहाय्याने आणि बुद्धिशक्तीच्या जोरावर करीत होते, तर समर्थ रामदास तेच कार्य 'समर्थ' रामाच्या भक्तीची प्रेरणा देऊन आणि रामकार्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मारुती-भक्तीच्या रूपाने बलोपासनेची प्रेरणा देऊन करीत होते.

'मराठा तितुका मेळवावा, आपला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।' ह्या शिकवणीबरोबरच

'सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें ।
परंतु तेथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे ॥'

ही देखील शिकवण ते आपल्या कीर्तनांतून, प्रवचनांतून आणि शिष्यांच्या द्वारा जनतेला देत होते. समर्थांची शिकवण महाराजांच्या कानी गेली होती व त्यामुळे समर्थांच्या दर्शनाची त्यांना उत्सुकता लागून राहिली होती.

शेवटी महाराष्ट्राच्या ह्या दोन महान सुपुत्रांच्या भेटीचा योग आला. चाफळपासून अर्ध्या मैलावर असलेल्या शिंगणवाडी येथे त्या दोघांची भेट झाली. समर्थांनी चाफळ येथे रामाचे देऊळ बांधून तेथे मठ स्थापन केला असला तरी त्यांचा मुक्काम बराचसा शिंगणवाडीच्या छोट्याशा डोंगरावर एका छोट्याशा गुहेतच असे. तेथे ते आपले जपजाप्य करीत असत. तेथे त्यांनी आपल्या आराध्य दैवताची-मारुतीची मूर्तीही स्थापन केली होती. शिवाजी महाराज व समर्थ यांची भेट येथील एका मोठ्या चिंचेच्या झाडाखाली झाली असे म्हणतात. ह्या भेटीत महाराजांनी समर्थांचे शिष्यत्व पत्करले व त्यांच्याकडून अनुग्रह घेतला.

ह्या भेटीनंतर शिवाजीमहाराज व समर्थ रामदास ह्यांच्या वारंवार भेटी होऊ लागल्या. राजकारण व भक्तिमार्ग ह्यांचा सुरेख संगम ह्या दोघांच्या परस्पर सल्लामसलतींतून होऊ लागला. पुढे तर समर्थांच्या सिद्धिसामर्थ्याचा,



व्यक्तिमत्वाचा व उपदेशाचा इतका प्रभाव शिवाजी महाराजांच्या मनावर पडला की एकदा त्यांनी आपले राज्यच समर्थांच्या झोळीत भिक्षा म्हणून घातले. समर्थांनी अर्थातच ते परत केल्याचे सांगून महाराजांना उपदेश केली की, "तुम्ही क्षत्रिय आहात. तुम्ही धर्मरक्षणाचे, शत्रूशी युद्ध करण्याचे, प्रजापालनाचे कार्य करीत रहावे, तेच तुमचे कर्तव्य आहे, तोच तुमचा 'धर्म' आहे. मी ब्राह्मण. सदुपदेश हे माझे कार्य, ते मी करीत राहीन. तुम्हाला माझ्या सल्ल्याची गरज वाटेल तेव्हा तुम्ही भवानी मातेचा कौल घ्यावा व निःशंकपणे कार्य हाती घ्यावे."

समर्थांनी स्थापन केलेल्या चाफळच्या राममंदिराला आणि त्यांनी स्थापन केलेल्या 'अकरा मारुतींना' शिवाजी महाराजांनी कालांतराने वतने नेमून दिली.

शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करून घेण्याचा आग्रह करणाऱ्यात समर्थ रामदास अग्रगण्य होते. शिवाजी राजांनी राज्याभिषेक करून घेतल्यानंतर समर्थ रामदासांना झालेला आनंद अवर्णनीय होता. शिवाजी महाराजांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला मिळालेल्या स्वातंत्र्याचे व आनंदाचे वर्णन समर्थांनी आपल्या 'आनंदवनभुवन' ह्या काव्यात केले असे आनंदून सांगतांना ते म्हणतात-

'बुडाला औरंग्या पापी, म्लेंछसंहार जाहला ।
झालें चहूंकडे पाणी, स्नानसंध्या करावया ॥'

भवानी-मातेच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतांना समर्थ म्हणतात-

'रामवरदायिनी माता, गदा घेऊनि ऊठली ।
मर्दिले पूर्वीचे पापी, आनंदवनभुवनीं ॥'

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर समर्थ रामदासांना विरक्ती आल्यासारखेच वाटू लागले. आता बराचसा काळ ते एकांतात घालवू लागले. आपले अवतारकार्य आता संपत आल्याची त्यांना जाणीव होऊ लागली. शिवाजी महाराजांच्या नंतर गादीवर आलेल्या संभाजी राजांनी आप्तस्वकीयांचा क्रूर संहार करण्याचा धुमाकूळ घातला. तेव्हा लोकांच्या आग्रहास्तव समर्थांनी संभाजी राजांना उपदेशाचे पत्र लिहिले. त्यांचा काहीसा परिणाम संभाजी महाराजांच्या वागणुकीवर झाला देखील. परंतु समर्थांच्या राजगुरुपदाला आता फारसा अर्थ राहिला नव्हता.

समर्थांनी स्थापन केलेल्या मठांचा व देवस्थानांचा कारभार त्यांनी त्यासाठी नेमलेल्या शिष्यांकडून नीट चालला होता. बरीच ग्रंथरचनाही एव्हांना समर्थांच्या हातून झाली होती. आता जिवाचा आटापिटा करून आयुष्यात करण्यासारखे काही उरले नव्हते.

शेवटी समर्थांनी निरवानिरव केली आणि 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' हे आपले वचन आपल्याच बाबतीत सिद्ध करून, माघ वद्य ९ शके १६०३ ह्या दिवशी सज्जनगडावर समाधी घेतली. रामरूपात त्यांचा देह विलीन झाला. तो विलीन होत असताना त्यांच्या मुखातून गर्जना चालली होती-

'जय जय रघुवीर समर्थ।'



# हनुमान आणि समर्थ रामदास

समर्थ रामदास स्वामींना हनुमानाचा अवतार समजतात. समर्थ स्वतःला हनुमानाप्रमाणेच 'रामाचा दास' म्हणवून घेत व तसे म्हणवून घेण्यात भूषण मानीत असत. रामभक्तीविना हनुमानाच्या चरित्राची जशी कल्पनाच करता येत नाही तशीच समर्थ रामदासांच्या चरित्राचीही कल्पना रामभक्तीशिवाय करताच येणार नाही.

राम हे समर्थांचे कुलदैवत होते. मारुतीच्याच श्रद्धेने ते रामाबद्दल म्हणतात-

'राम सर्वांगें सुंदरू, राम करुणेचा सागरू ।
दीन अनाथांचा उद्धारू, येक श्रीराम कर्ता ॥'

'श्रीराम जयराम जय जय राम,
ऐसा कांहीं एक धरुनी नेम ।
जप कीजे तेणें आत्माराम, जोडेल नेमें ॥'

मारुती प्रभु रामचंद्रांच्या प्रत्यक्ष सहवासात राहून रामभक्तीने लीन होता. समर्थ रामदासही मनाने सतत प्रभु रामचंद्रांच्या चरणी लीन झालेले होते. प्रभु रामचंद्रांनी त्यांना अनेकदा दर्शन दिले असा समज आहे.

हनुमानाच्या ठिकाणी असलेल्या प्रचंड बलाचीच उपासना समर्थांनी शिकविली. हनुमानाजवळ शक्तिसामर्थ्य, भक्तिसामर्थ्य, युक्तिसामर्थ्य, बुद्धिसामर्थ्य, सिद्धिसामर्थ्य आणि सेवासामर्थ्य अशी सामर्थ्ये होती. तशीच ती समर्थ रामदासांच्या ठिकाणीही होती.

हनुमानाला सूर्याच्या वरदानाने सर्व शास्त्रांचे ज्ञान प्राप्त झालेले होते. रामदासांचे वडील सूर्याजीपंत यांना प्राप्त झालेल्या सूर्यवरदानानेच रामदासांच्या ठिकाणी अलौकिक ग्रहणशक्ती आणि एकपाठीपणा आला व त्यामुळे त्यांना सर्व शास्त्रांचे ज्ञान सहज अवगत करता आले.

हनुमानाचा बालवयांतला व्रात्यपणा आणि हूडपणा रामदासांच्या ठिकाणीही त्यांच्या बालवयात होता. हनुमानाने अगदी लहानपणी सूर्यबिंब पकडण्यासाठी केलेल्या हूडपणामुळे त्याला इंद्राकडून हनुवटीवर प्रहार सहन करावा लागला व हनुवटीवरची प्रहाराची खूण कायमची राहिली, त्याचप्रमाणे रामदासांनी लहानपणी हूडपणाच्या व हट्टाच्या भरात उंच वृक्षावरून खाली नदीत टाकलेल्या उडीमुळे कपाळाला आलेल्या टेंगुळाची खूण जन्मभर कायम राहिली.

हनुमान हा त्याच्या आईवडिलांना वरदानाने प्राप्त झालेला पुत्र होता. तसेच रामदासदेखील त्यांच्या वडिलांना वरदानानेच प्राप्त झालेले पुत्र होते.

सूर्यदेवाने रामदासांच्या वडिलांना, सूर्याजीपंतांना, वर देऊन सांगितले, ''तुम्हाला पहिला पुत्र माझ्या अंशेकरून होईल व दुसरा पुत्र मारुतीच्या अंशेकरून होईल.''

रामदासांच्या वेळी त्यांच्या आईला डोहाळे लागले तेव्हा ती म्हणायची ''मी नरनारायण आहे. मी हनुमंतरूपी नरवानराकृती आहे. मी रघुनाथाला प्रिय आहे. रघुनाथाचे स्मरण करा. मी आत्माराम नित्य, शाश्वत, चिरंतन आहे. मला कृष्णातीर पुनीत करावयाचा आहे.''

अशीही एका आख्यायिका आहे की त्रेतायुगात ब्रह्मचारी हनुमंताच्या मागे जी कळत न कळत स्त्रियांची कुलंगडी लागली ती त्याने कलियुगात रामदासांचा अवतार धारण करून निस्तरली ! रामावतारी हनुमंत एकदा समुद्रतीरावर सकाळच्या वेळी मुखमार्जन करीत असता त्याने आपला खाकरा समुद्रात टाकला तो एका मगरीने गिळला. (हनुमंत उड्डाण करीत असताना त्याचा घाम खाली पडला ते मगरीने गिळला अशीही कथा आहे). त्या खाकऱ्याच्या (किंवा घामाच्या) प्रभावाने त्या मगरीला गर्भ राहिला व पुत्र झाला. तेव्हा मगरीने हनुमंताशी पत्नीचे नाते जोडले. हनुमंताला ह्या पेचातून सुटकेचा मार्ग दिसेना. तेव्हा प्रभु रामचंद्रांनी तोड काढली व हनुमंताला सांगितले की 'कलियुगात तुझ्यावर लग्नाची पाळी येईल व त्या नाममात्र विवाहसंस्काराने ह्या तुझ्या निर्माण झालेल्या नात्यातून तुझी सुटका होईल.'' ह्याचा अर्थ असा की कलियुगात मगरीच्या रूपातील स्त्रीशी प्रत्यक्ष लग्न व्हायचे नव्हते, विवाहसंस्कार पूर्ण व्हायचा नव्हता, फक्त अंतरपाट धरीपर्यंतच लग्नाच्या बोहल्यावर उभे रहावे लागणार होते. हनुमंताला रामचंद्रांनी सुचवलेली तोड मान्य करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. अशा तऱ्हेने रामदासांनी लग्नाच्या बोहल्यावरून पळून जाऊन हनुमानाची कलियुगांतली जबाबदारी पार पाडली होती!



रामदास टाकळी येथे पुरश्चरण (श्रीराम जयराम जय जय राम ह्या त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप व तपश्चर्या) करीत असताना रोज एक माकड तेथे घाटावर येऊन बसायचे, रामदासांचा तेरा कोटींचा जप पूर्ण झाला. ते ध्यानस्थ बसले असता ते माकड त्यांच्यासमोर बसले. त्या माकडातील हनुमानाने रामदासांच्या शरीरात प्रवेश केला. रामदासांनी डोळे उघडले तेव्हा त्या माकडाने म्हणजेच हनुमानाने आपले प्रचंड भीमरूप रामदासांना दाखविले व प्रेमभराने त्यांना आलिंगन दिले आणि कृष्णातीरी जाऊन जगदुद्धार करण्याचा प्रभु रामचंद्रांचा आदेश सांगितला. रामदास आणि मारुती ह्यांच्यामध्ये इतके जिव्हाळ्याचे साहचर्य होते.

समर्थांच्या वाङ्मयात, 'हनुमंत आमुची कुळवल्ली','आमची कुळी हनुमंत' असे हनुमंताविषयीचे उद्गार ठिकठिकाणी आढळतात.

हनुमानाचा वायुवेग आणि आकाशगमन ह्या गोष्टींचा प्रत्यय रामदासांनीही आपल्या आयुष्यात घेतला होता असे म्हणतात. एकदा एका मंदिराच्या उत्सवाच्या वेळी वाटेत अडथळा आणणाऱ्या एका झाडाच्या फांद्या तोडाव्यात असे समर्थांनी ठरविले. परंतु ह्या गोष्टीस तेथील यवन अधिकाऱ्याने हरकत घेतली. उत्सव तर सुरू झालेला, आणि फांद्या तोडण्याची परवानगी विजापूरहून बादशहाकडून आणायची म्हणावे तर विजापूर किती तरी दूर ! तेव्हा समर्थांनी मनात काही विचार केला व ते अचानक नाहिसे झाले. ते विजापुरात बादशहासमोर हजर झाले. समर्थांची तेजस्वी मूर्ती पाहून बादशहासुद्धा प्रभावित झाला. त्याने फांद्या तोडण्यास मनाई करू नये असा हुकूम त्या यवन अधिकाऱ्याच्या नावे लिहून दिला. समर्थ उड्डाण करून विजापुरास आले होते. त्यांनी तो हुकूम घेऊन पुन्हा उड्डाण केले व तो हुकूम आणून यवन अधिकाऱ्याकडे दिला. तो यवन अधिकारी चकित झाला, परंतु बादशहाचा सही व शिक्का असलेल्या त्या हुकमापुढे त्याला काही करता येईना. फांद्या तोडल्या गेल्या व उत्सव सुरळीतपणे पार पडला.

वरीलप्रमाणेच शिवाजी महाराजांच्या देखत समर्थ एकदा अचानक उड्डाण करून निघून गेल्याचीही कथा आहे.

रामराज्याच्या प्रतिष्ठापनेला हातभार लावणे हे हनुमानाचे एक कार्य होते, तसेच शिवाजी महाराज स्थापन करू पाहात असलेल्या हिंदवी स्वराज्याचे रामराज्य बनविण्यास हातभार लावण्याचे कार्य समर्थांनी चालविले होते.

हनुमान आणि रामदास यांच्यांतील परस्पर संबंधांच्या, त्यांच्या एकरूपतेच्या आणि दोघांमधील दैवी संबंध सिद्ध करणाऱ्या अनेक गोष्टी समर्थचरित्रात आढळतात. समर्थांच्या ठिकाणी असलेल्या मारुती-भक्तीचा, हनुमंताशी असलेल्या त्यांच्या सायुज्यतेचा परिपाक म्हणजेच त्यांच्या हातून ठिकठिकाणी झालेली मारुती-मूर्तींची स्थापना होय.

***



# समर्थांची मारुती-स्थापना : प्रेरणा व स्वरूप :

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास हे संत म्हणजे मराठी भक्तिपरंपरेच्या पंचगंगाच मानल्या जातात. परंतु रामदासांच्या भक्तिगंगेच्या प्रवाहाचे इतर संतांच्या भक्तिप्रवाहापेक्षा असलेले वेगळेपण जाणवल्याशिवाय राहात नाही.

ह्या चारही संतांच्या काळाच्या अगोदर काही शतकांपासून सबंध हिंदुस्थानात मुसलमानी राजसत्ता स्थिरावलेली होती. ती सत्ता जुलमी होती. त्या सत्तेकडून हिंदू समाजावर अनन्वित अत्याचार होत होते. हिंदू धर्माला वनवासच प्राप्त झाला होता. दुष्काळ, अत्याचार, जुलुम-जबरदस्ती, दुःख-दारिद्य, उद्वेग, अशाश्वती आणि लाचारी सर्वच हिंदूच्या वाट्याला येत होती. ह्या परिस्थितीचा परिणाम असा झाला की 'संसार असार आहे', 'देव ठेवील तैसे राहावे' अशा प्रकारची शिकवण देऊन लोकांना भक्तिमार्गाकडे नेणाऱ्या ह्या संतांचे आकर्षण हिंदू जनतेला वाटू लागले. ह्या भक्तिमार्गाची परिणति सर्वत्र निराकांक्षा पसरण्यात आणि अन्यायाविरुद्धची प्रतिकारशक्ती लोप पावण्यात झाली.

समर्थांच्या काळातही महाराष्ट्रात इतर अनेक संत होते व त्या सर्वांची शिकवण वरील प्रकारचीच होती.

समर्थ रामदासस्वामींनी बारा वर्षे तपश्चर्या केल्यानंतर सबंध भारतभर पायी भ्रमण करून हिमालयातील तीर्थक्षेत्रांपासून तो दक्षिणेस रामेश्वरापर्यंत सर्व तीर्थक्षेत्रांना भेट दिली. ह्यामुळे तत्कालीन समाजस्थितीचे दर्शन त्यांना घडले. सर्वत्र हिंदूंची दैन्यावस्था त्यांनी पाहिली. राम हे त्यांचे कुलदैवत असल्यामुळे आणि राम ह्या सामर्थ्यसंपन्न 'असुरमारक' आणि 'देवतारक' असल्यामुळे आणि तो 'रामराज्य' प्रदान करणारा असल्यामुळे त्याची भक्ती करण्याकडे हिंदू जनतेचे मन वळवावे म्हणजेच तिची सद्यःस्थितीतून सुटका होईल, असा विचार त्यांनी

केला. तपश्चर्या करताना आणि त्यानंतर तीर्थाटन करताना, रामभक्ती आणि हनुमानभक्ती यांच्या योगाने स्वतःचा उद्धार करून घ्यावा हाच त्यांचा प्रधान हेतू होता. परंतु तपश्चर्या चालू असताना श्रीराम आणि हनुमान यांनी दर्शन देऊन 'कृष्णातीरी जगदुद्धार कर' असा त्यांना आदेश दिलेला असल्यामुळे, तीर्थाटन करून आल्यानंतर त्यांनी असे ठरविले की आपल्या ओजस्वी वाणीचा, आपल्या ज्ञानाचा, आपल्या अनुभवाचा आणि आपल्याला प्राप्त झालेल्या सिद्धीचा उपयोग हिंदू जनतेची मने रामभक्तीकडे वळवून तिला तिच्या दुरावस्थेतून बाहेर काढण्यासाठी करावा. "संसार क्षणभंगुर आहे, मरण केव्हातरी येणारच, म्हणून आपले जीवन लोकसेवेत घालविल्यास जन्मसाफल्य होते व तीच रामाची सेवा होय." अशी शिकवण लोकांना द्यायला त्यांनी सुरुवात केली. त्याचबरोबर, रामाचा संदेश पोहोचविणारा सर्वश्रेष्ठ दास जो मारुती त्याच्या ठिकाणी असलेल्या बलाची उपासनादेखील लोकांना शिकवावी असेही त्यांनी ठरविले. ह्यासाठी लोकसंग्रह आणि लोकजागृती करणे आवश्यक आहे हे जाणून त्यांनी महाराष्ट्रात गावोगाव भ्रमण केले आणि कित्येक ठिकाणी मारुतींची स्थापना केली. लोकांना मारुतीच्या उपासनेला लावून धैर्य, वीर्य आणि बलसंपादनाची ईर्षा त्यांनी लोकांमध्ये निर्माण केली.

समर्थांनी आपल्या तीर्थाटनामध्ये उत्तर भारतातही मारुतीमंदिरे स्थापन केली. त्यापैकी हनुमंत घाटावरील हनुमान मंदिर, तेलंगणातील हनुमानाचे मंदिर, ही मंदिरे प्रसिद्ध आहेत. तसेच दक्षिणेकडील रामेश्वराच्या सेतुबंधाजवळील हनुमान मंदिरही प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात तर त्यांनी कित्येक ठिकाणी मारुतीच्या मूर्ती स्थापन केल्या. समर्थ रामदास आणि मारुती ह्या दोन गोष्टींचे साहचर्य लोकांच्या मनात इतके ठसले आहे की एकाद्या ठिकाणची मारुतीची मूर्ती कोणी केव्हा स्थापन केली हे माहीत नसेल तर ती समर्थ रामदासांनी स्थापन केलेली असणार असे गृहीत धरले जाते. तसेच समर्थांनी स्थापन केलेली मूर्ती कोठेही असो, ती ओळखण्याची खूण म्हणजे, रामापुढे मारुतीराय असले की ते हात जोडूनच उभे असणार आणि एकटे मारुतीराय असले की त्यांचे हात प्रहार करण्याच्या भूमिकेत असणार व पायाखाली राक्षस तुडविलेला असणार!

समर्थांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मारुतीची स्थापना केली असली तरी 'समर्थांनी स्थापन केलेले अकरा मारुती' म्हणून जे प्रसिद्ध आहेत ते पुढील प्रमाणे आहेतः-



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शहापूर येथे | १ | (स्थापना | शके | | १५६६) |
| मसूर येथे | १ | ( | " | " | १५६७) |
| चाफळ येथे | २ | ( | " | " | १५७०) |
| शिंगणवाडी येथे | १ | ( | " | " | १५७१) |
| उंब्रज येथे | १ | ( | " | " | १५७१) |
| माजगाव येथे | १ | ( | " | " | १५७१) |
| बहे-बोरगाव येथे | १ | ( | " | " | १५७३) |
| मनपाडळे येथे | १ | ( | " | " | १५७३) |
| पारगाव येथे | १ | ( | " | " | १५७४) |
| शिराळे येथे | १ | ( | " | " | १५७६) |

ह्या अकरा मारुतींच्या स्थापनेचा जो काळ येथे दिला आहे त्याबद्दल मतभेद आहेत, परंतु शहापूरचा मारुती ह्या 'अकरा मारुतींत' पहिला याबाबत मात्र मतभेद नाहीत.

वास्तविक समर्थांनी सर्वांत प्रथम स्थापिलेली मारुतीची मूर्ती गोदावरीच्या तीरावर टाकळी येथील गोमयाची मूर्ती ही होय. तीर्थाटनाला जाण्यापूर्वी त्यांनी ही मूर्ती आपला शिष्य उद्धव याच्या मारुती उपासनेसाठी स्थापिली, परंतु ह्या मूर्तीचा समावेश 'अकरा मारुतीत' नाही. तसेच ,सज्जनगड येथील मारुती, शिवथर घळींतील मारुती, मिरज, महाबळेश्वर, वाई, तंजावर, टेंभू, शिरगाव येथील मारुती, ह्यांचाही अकरा मारुतीत समावेश नाही. असे का ह्याचे समाधानकारक उत्तर सापडत नाही. रामदासांच्या विशिष्ट अकरा मारुतींपैकी काहींना कदाचित राजकीय दृष्ट्या मोक्याच्या स्थानामुळे महत्त्व दिले गेले असेल, कदाचित समर्थांनी अनुग्रह दिलेल्या शिष्यांच्या आग्रहास्तव त्यांतील काहींची स्थापना केली गेली म्हणून त्यांना महत्त्व दिले गेले असेल, किंवा काहींना अन्य काही कारणास्तव महत्त्व दिले गेले असेल; परंतु एक गोष्ट मात्र लक्षात घेण्यासारखी आहे की ज्या अकरा मारुतींना विशेष महत्त्व दिले गेले आहे ते सर्व मारुती कृष्णेच्या परिसरांतील आहेत. 'कृष्णातीरी जगदुद्धार कर' ह्या दैवी दृष्टान्तामुळे ह्या कृष्णातीरींच्या मारुतींना विशेष महत्त्व दिले गेले असावे असाही तर्क काढता येण्यासारखा आहे.

समर्थांच्या शिष्या वेणाबाई ह्यांच्या पुढील अभंगात ह्या अकरा मारुतींच्या स्थलाबद्दल उल्लेख आहे :-

'चाफळामाजीं दोन, उंब्रेजेसी येक ।
परागांवी देख चौथा तो हा ॥
पांचवा मसुरीं, शहापुरीं सहावा ।
जाण तो सातवा शिराळ्यांत ॥
सिंगणवाडीं आठवा, मनपाडळें नववा ।
दहावा जाणावा माजगावीं ॥
बाह्यांत अकरावा येणेरीती गावा ।
सर्व मनोरथा पुरवील ॥
वेणी म्हणे स्वामी समर्थ रामदास ।
कीर्ती गगनांत न समावे ॥'

समर्थ-प्रतापात ह्या अकरा मारुतींचा उल्लेख पुढीलप्रमाणे आहेः-

'बाहेग्रामीं शक्ति ग्रामीं । मसुग्रामीं पूर्वग्रामी ॥
उंबरग्रामीं शृंगग्रामीं । हनुमान स्थापिले समर्थे ॥
बाहेग्रामीं उपग्रामीं स्थान । मानसग्रामीं पारग्रामी हनुमान ॥
अधिष्ठानीं महारुद्र मुख्य प्राणनाथ निधान ।
पूर्वपश्चिमे स्थापिले समर्थे ॥'

समर्थांचे शिष्य अनंतकवि ह्यांनी ह्या अकरा मारुतींचा केलेला उल्लेख पुढीलप्रमाणे आहे :-

'जेणें रुद्र दहा मनोहर जगीं येकागळे स्थापिले ।
प्रत्येकीं अकरा बिघे नृपतिच्या मुद्रांकिती अर्पिले ॥
त्या त्या नागरिका जना नवविधा भक्तीसि लावीतसे ।
ऐसा सद्‌गुरु जो अनंतकविचा, बद्धासि तारीतसे ॥

समर्थांचे हे अकरा मारुती जागृत देवस्थाने आहेत असे मानले जाते. ह्या अकरा मारुतींना 'वारीचे मारुती' असेही म्हणतात.

समर्थांकडून अनुग्रह घेतलेल्या शिवाजी महाराजांनी समर्थांच्या विनंतीवरून अकरा मारुतींच्या योगक्षेमासाठी प्रत्येकी अकरा बिघे जमिनीचे वतन लावून दिले. चाफळ येथील मुख्य देवस्थान जे राममंदिर त्याच्या व्यवस्थापनाखाली ही सर्व अकरा मारुती-स्थाने आहेत. परंतु ह्या सर्व देवस्थानांच्या व्यवस्थेच्या बाबतीत सुसूत्रता आढळत नाही. यांतील काही मारुतीमंदिरांचा जीर्णोद्धार झालेला आहे. परंतु काही ठिकाणी दिवाबत्तीचीही



नीट सोय नाही. काही ठिकाणी मारुतीची दैनंदिन पूजादेखील यथायोग्य पद्धतीने होत नसावी असे दिसते. यापैकी बऱ्याच मारुतीक्षेत्रांवर तेथे दर्शनासाठी येणाऱ्या यात्रेकरूंसाठी राहण्याजेवणांची काहीच सोय नाही. काही ठिकाणी देवस्थानाचे पवित्र वातावरण मुळीच आढळत नाही.

मात्र, आज ह्या अकरा मारुतींपैकीं प्रत्येक ठिकाणी एस.टी. जाऊन पोहोचलेली आहे एवढीच एक बाब त्यातल्या त्यात समाधानाची आहे. शिवाय आता काही यात्रा-संस्थादेखील ह्या अकरा मारुतींच्या दर्शनासाठी यात्रा आयोजित करू लागल्या आहेत, हीही एक आनंदाची गोष्ट आहे. ह्या अकरा मारुतींचे ओझरते दर्शन घ्यावयाचे म्हटले तरी सुमारे तीन दिवसांची यात्रा होते.

ह्या अकरा मारुतींपैकी प्रत्येक मारुतीची शक्य ती उपलब्ध माहिती यापुढे स्वतंत्र प्रकरणात दिलेली आहे. ती माहिती वाचल्यानंतर व मारुती-स्थानांना प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर वाचक-यात्रेकरूंच्या भाविक मनात कदाचित काहीशी उद्विग्नता निर्माण होण्याचा संभव आहे. आपल्या पवित्र देवस्थानांची दुर्दशा म्लेंछांच्या उपद्रवामुळे नव्हे, तर आम्हा हिंदुधर्मियांच्या अनास्थेमुळेच निर्माण झालेली आहे ही जाणीव मनाला झाल्याशिवाय राहात नाहीत. समर्थ-स्थापित अकरा मारुतींच्या सध्यांच्या स्थितीत सुधारणेला पुष्कळच वाव आहे. ह्या बाबतीत आपण काय करू शकतो ह्याचा विचार मारुतीभक्तांनी केला पाहिजे एवढेच सुचवावेसे वाटते !

***

# समर्थकृत 'भीमरूपी' स्तोत्र

समर्थ रामदास स्वामींनी आपले उपास्य दैवत जो हनुमान, त्याच्या स्तुतिपर १३ स्तोत्रे केलेली आहेत. त्यांना 'भीमरूपी' स्तोत्रे म्हणतात. ह्या स्तोत्रांचे पठण केले असता सर्वप्रकारची संकटे व व्याधी दूर होतात असे मानले जाते. ह्या भीमरूपी स्तोत्रांत सर्वांत प्रसिद्ध असे जे स्तोत्र आहे ते येथे दिले आहे. सर्वसामान्यपणे हेच भीमरूपी स्तोत्र म्हणून ओळखले जाते. रामदासांची तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर एकदा ते ध्यानस्थ बसलेले असताना स्वतः हनुमंताने त्यांना आपल्या आक्राळविक्राळ दिव्य भीमरूपाचे दर्शन घडविले व त्यांच्या रामभक्तीवर प्रसन्न होऊन त्यांना आनंदाने मिठी मारली तेव्हा रामदासांच्या तोंडून उत्स्फूर्तपणे हे स्तोत्र बाहेर पडले अशी ह्या स्तोत्राबद्दल समजूत आहे. ह्या स्तोत्राच्या पठणाने सर्व संकटे व व्याधी तर दूर होतातच, पण शनीचाही त्रास कमी होतो अशीही ह्या स्तोत्राची प्रसिद्धी आहे.

## भीमरूपी स्तोत्र

भीमरूपी महारुद्रा, वज्र हनुमान मारुती ।
वनारी अंजनीसूता, रामदूता प्रभंजना ॥१॥
महाबळी प्राणदाता, सकळां उठवी बळें ।
सौख्यकारी दुःखहारी, धूर्त वैष्णवगायका ॥२॥
दीननाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरा ।
पातालदेवताहंता, भव्य सिंदुरलेपना ॥३॥
लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला, पावना परितोषका ॥४॥
ध्वजांगे उचली बाहो, आवेशें लोटला पुढें ।
काळाग्नि काळ रुद्राग्नि, देखतां कांपती भयें ॥५॥
ब्रह्मांडें माइलीं, नेणों आवळे दंतपंगती ।
नेत्राग्नि चालिल्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळें ॥६॥
पुच्छ तें मुरडिलें माथां, किरीटी कुंडलें बरीं ।
सुवर्ण कटि कांसोटी, घंटा किंकिणि नागरा ॥७॥
ठकारे पर्वताऐसा, नेटका सडपातळू ।
चपळांग पाहतां मोठें महाविद्युल्लतेपरी ॥८॥
कोटिच्या कोटि उड्डाणे, झेपावे उत्तरेकडे ।
मंद्राद्रीसारखा द्रोणू, क्रोधें उत्पाटिला बळें ॥९॥
आणिला मागुती नेला, आला गेला मनोगती ।
मनासी टाकिलें मागें, गतीसी तुळणा नसे ॥१०॥
अणूपासोनि ब्रह्मांडा येवढा होत जातसे ।
तयासी तुळणा कोठें, मेरुमंदार धाकुटे ॥११॥
ब्रह्मांडाभोवते वेढे, वज्रपुच्छें करू शके ।
तयासी तुळणा कैंची , ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥१२॥
आरक्त देखिलें डोळां ग्रासिलें सूर्यमंडळा ।
वाढता वाढतां वाढे, भेदिलें शून्यमंडळा ॥१३॥

फलश्रुति -

धनधान्यपशुवृद्धि, पुत्रपौत्र समस्तही ।
पावती रूपविद्यादि, स्तोत्रपाठेंकरूनियां ॥१४॥
भूतप्रेतसमंधादि, रोगव्याधी समस्तही ।
नासती तुटती चिंता, आनंदे भीमदर्शनें ॥१५॥

प्रार्थना :-

हे धरा पंधराश्लोकी, लाभली शोभली बरी ।
दृढदेहो निसंदेहो, संख्या चंद्रकळा गुणें ॥१६॥
रामादासीं अग्रगणू, कपिकुळासी मंडणू ।
रामरूपी अंतरात्मा दर्शनें दोष नासती ॥१७॥"

इति श्रीरामदासकृतं संकटनिरसनंनाम मारुतिस्तोत्रं संपूर्णम् ।

हे स्तोत्र रोज सूर्योदयापूर्वी म्हणण्याचा प्रघात ठेवला तर मनुष्य निर्भय आणि विद्यावान होतो, कीर्तिमान होतो, मारुतीप्रमाणे 'बुद्धिमतां वरिष्ठः' म्हणजे अत्यंत बुद्धिमान होतो. ज्याला हे स्तोत्र रोज म्हणता येणे शक्य नसेल त्याने

दर शनिवारी आणि पौर्णिमेच्या दिवशी ते अकरा वेळा म्हणावे व मारुतीच्या खांद्यावर आणि दोन्ही पायांवर पांढरी फुले वाहावीत.

जो मनुष्य शुचिर्भूत होऊन, (स्नान वगैरे करून), मारुतीच्या मूर्तीसमोर बसून, एकाग्रचित्ताने, रोज अकरा वेळा, याप्रमाणे एकशेएकवीस दिवस ह्या स्तोत्राचा जप करील त्या माणसाला हे स्तोत्र 'सिद्ध' झाले असे समजावयाचे.

शनी हे फार कडक दैवत आहे. त्याची उपासना करूनही ते प्रसन्न होईलच असे नाही, त्याच्या क्रोधाचा फटकारा मात्र तीव्र असतो. शनीच्या ह्या त्रासावर निश्चित इलाज फक्त मारुतीच्या उपासनेचा, भीमरूपी स्तोत्राच्या पठणाचा. ह्याबाबतीत एक कथा आहे ती अशी-

एकदा मारुती निवान्तपणे श्रीरामाचे भजन करीत समुद्रतीरी बसला होता. गर्विष्ठ शनीने त्याला पाहिले व त्याला आपल्याशी युद्ध करण्याचे आव्हान दिले. तेव्हा हनुमान त्याला म्हणाला, " मी आता म्हातारा झालो आहे, रामभजनात मी दंग आहे, मला त्रास देऊ नको." परंतु शनी ऐकेना. तो हनुमानाला पुन्हा पुन्हा युद्धाचे आव्हान देऊन त्रास देत राहीला. तेव्हा हनुमानाने त्याला आपल्या शेपटाच्या विळख्यात गुंडाळले आणि तो तेथील खडकाळ किनाऱ्यावर जोराजोराने शेपूट आपटत इकडे तिकडे पळू लागला. शनीला हनुमानाच्या विळख्यातून आपली सुटका करून घेता येईना. त्याचे अंग अनेक ठिकाणी ठेचकाळले. शेवटी त्याने हनुमानाची विनवणी केली व म्हटले, "मला कृपा करून सोड. मी चुकलो, मी पुन्हा तुझ्या वाटेला जाणार नाही." तेव्हा मारुतीने त्याच्याकडून असे वचन घेतले की "तुझ्याच नव्हे, तर तुझ्या भक्तांच्या देखील वाटेला मी कधी जाणार नाही." हनुमानाने त्याला बजावले की "तू माझ्या भक्तांच्या वाटेला गेलास तर त्याहीपेक्षा अधिक हाल सोसावे लागतील," आणि त्याने शनीला सोडून दिले. शनीने हनुमंताची क्षमा मागितली. तो आपल्या ठेचकाळलेल्या अंगाला व त्यावरील जखमांना लावण्यासाठी तेलाची भीक मागत हिंडू लागला. जो कोणी त्याला तेल देई त्याच्यावर तो कृपा करी. तेव्हापासून शनीला तेल घालण्याचा प्रघात पडला. परंतु लोक शनीची कृपा संपादन करून त्याला प्रसन्न करण्याऐवजी त्याला मारुतीच्या धाकात ठेवणे अधिक पसंत करतात. त्यामुळे अनेक लोक शनीऐवजी मारुतीलाच दर शनिवारी तेल शेंदूर वगैरे वाहातात व मारुतीला प्रसन्न करून शनीच्या त्रासावर उतारा शोधतात ! लोक दर शनिवारी



मारुतीच्या दर्शनाला जाऊन व मारुतीच्या भीमरूपी स्तोत्राचे पठण करून मारुतीला प्रसन्न करतात.

शनीची साडेसाती प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात दोनतीनदा येते. साडेसातीच्या काळात हे भीमरूपी स्तोत्र 'सिद्ध' करून त्याचे वारंवार पारायण केले तर शनीच्या साडेसातीचा त्रास कमी होतो.

लहान मुले कधी एकदम भितात. अशा वेळी ह्या भीमरूपी स्तोत्राचा चांगला उपयोग होतो. ज्याने हे स्तोत्र 'सिद्ध' करून घेतले आहे अशा माणसाने एकवार हे स्तोत्र म्हणून भ्यायलेल्या मुलाला अंगारा, पाणी अथवा तांदूळ दिले तर त्या मुलाची भीती नाहीशी होते. अशा व्यक्तीने हे स्तोत्र म्हणून मंदबुद्धीच्या मुलाला मंतरलेले पाणी दिले तर त्या मुलाची बुद्धी सुधारते. भूतपिशाच्चबाधा देखील ह्या स्तोत्राच्या पठणाने नाहीशी होते. मनुष्य निर्भय बनतो, त्याला सर्व क्षेत्रांत यश मिळते, त्याला उत्तम गती मिळते. अशी ह्या स्तोत्राची फलश्रुती आहे.

***

# समर्थ स्थापित अकरा मारुती

## ✵ श्रीक्षेत्र शहापूर ✵

कऱ्हाड-मसूर रस्त्यावर समारे नऊदहा किलोमीटर अंतरावर शहापूरचा फाटा आहे. मारुतीचे मंदिर मुख्य रस्त्यापासून दोन फर्लांग तरी आत आहे. शहापूर गावाच्या एका टोकाला नीदतीरावर हे मंदिर आहे.

येथील मारुतीची मूर्ती नेमकी कशाची बनलेली आहे हे सांगता येत नाही, पण ती चुन्याची बनविलेली आहे असे मानले जाते. मूर्तीची उंची सुमारे ६ फूट आहे. ह्या मारुतीला 'शहापूरचा चुन्याचा मारुती' असेच म्हणतात. मूर्तीचा चेहरा उग्र वाटतो. मारुतीच्या डोक्याला गोंड्याची टोपी आहे. देवळाला तीन चौकटी आहेत. देऊळ आणि मूर्ती पूर्वाभिमुख आहे. मूर्तीच्या पूजेची व्यवस्था शहापूरकर कुळकर्णी घराण्याकडे आहे. येथे चैत्र शु. १५ ह्या तिथीला दरवर्षी हनुमानजयंतीचा उत्सव साजरा केला जातो. ह्या देवळात मारुतीची वीतभर उंचीची एक पितळेची उत्सवमूर्ती आहे. चाफळ येथील रामनवमीच्या उत्सवात ही मूर्ती तेथे असणे आवश्यक असते.

समर्थांच्या अकरा मारुतींपैकी हा मारुती कालानुक्रमाने पहिला मानला जातो. शके १५६६/सन १६४५ मध्ये त्याची स्थापना झाली.

या मूर्तीच्या स्थापनेबद्दल एक आख्यायिका आहे, ती अशी-

शहापूर हे गाव आदिलशाहीत होते. तेथील बाजीपंत कुलकर्णी हे देवभक्त होते. कुळकर्णी आपल्या कामात चोख असत. समर्थांचा मुक्काम त्यावेळी तेथूनच जवळ असलेल्या चंद्रगिरी डोंगरावर असायचा व ते शहापुरात माधुकरी मागायला यायचे. ते बाजीपंत कुळकर्ण्यांच्या घरासमोर "जयजय रघुवीर समर्थ" असे शब्द उच्चारून भिक्षा मागायला उभे राहत, तेव्हा बाजीपंतांची पत्नी सतीबाई हिला ते आवडत नसे, ती समर्थांना 'गोसावडा' म्हणायची आणि त्यांना भिक्षा वाढलीच तर तणतणतच येऊन नाइलाज असल्यासारखी वागायची. हा क्रम असाच चालला असता एक दिवस समर्थांना त्या घरातले वातावरण दुःखी वाटले. बाई सुद्धा तणतणत आल्या नाहीत. समर्थांनी चौकशी केली तेव्हा त्यांना घरातल्या मंडळींनी सांगितले की बाजीपंत कुळकर्ण्यांना गावकीच्या हिशोबाच्या संबंधात मुसलमानांनी पकडून विजापुरास नेले आहे म्हणून सर्व मंडळी काळजीत आहेत. तेव्हा समर्थ सतीबाईंना म्हणाले, "आजपासून पाचव्या दिवशी बाजीपंत



सुखरूप परत आले तर तुम्ही रामनामाचा जप कराल काय?" सतीबाई म्हणाल्या "बाबारे तसे झाले तर मी रामनामाचा जप एकदाच काय हजारदा करीन." समर्थ निघून गेले. ते कारकुनाच्या वेषात आदिलशहा समोर हजर झाले व म्हणाले, "बाजीपंतांच्या श्वशुरांकडून व पत्नीकडून मी बाजीपंतांचा गावकीचा हिशोब समजावून सांगायला व पुरा करायला आलो आहे. माझे नाव दासोपंत." त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आदिलशहावर पडला. त्याने आपल्या एका अधिकाऱ्याला 'दासोपंतां'कडून हिशोब समजावून घ्यायला सांगितले. समर्थांनी त्या अधिकाऱ्याला हिशोब नीट समजावून दिला व बाजीपंतांची सुटका करून घेतली.

सुटका झाल्यानंतर बाजीपंत व ते शहापूरला यायला निघाले. बाजीपंत दासोपंतांना एकसारखे विचारीत, "तुम्हाला कोणी पाठविले? श्वशुरांच्या तोंडून तुमचे नाव कधी ऐकले नाही." समर्थ त्यांना सांगत, "घरी चला. सगळी लोकं तुमची वाट बघत आहेत. तेथे गेलात की कळेल," गावच्या वेशीपर्यंत बाजीपंत व समर्थ बरोबरीने चालत होते. नंतर समर्थ हळूच मागच्या मागे निघून गेले. बाजीपंत मागे पळून पाहातात तो दासोपंत अदृश्य ! घरी येऊन त्यांनी चौकशी केली, "तुम्ही कोणी दासोपंत नावाचा कारकून आदिलशहाकडे पाठविला होतात काय?" सतीबाई आश्चर्यचकित झाल्या. त्यांनी तर कोणालाच पाठविले नव्हते, मग हा चमत्कार काय झाला? तेवढ्यात त्यांना दारावर भिक्षा मागायला येणाऱ्या गोसाव्याची आठवण झाली. त्याने सांगितलेले शब्द आठवले. त्याने सांगितलेल्याच नेमक्या दिवशी बाजीपंत सुखरूप घरी आले होते. आता त्यांच्या मनाला चुटपूट लागून राहिली, बाईंटही वाटले. त्यांनी व बाजीपंतांनी ओळखले की तो गोसावी कोणी साधासुधा माणूस नव्हता, कोणीतरी सिद्ध पुरुष होता. सतीबाई आणि बाजीपंतांनी ठरविले की त्या साधूचे पुन्हा दर्शन होईपर्यंत भोजन घ्यायचे नाही. तीन दिवस असेच गेले. समर्थांना अंतर्ज्ञानाने हे कळले. त्यांना त्या दोघांची दया आली व चौथ्या दिवशी ते त्या घरी आले व त्यांनी घोष केला, 'जय जय रघुवीर समर्थ." सतीबाई धावत आल्या व समर्थांच्या पाया पडल्या व आतापर्यंतच्या आपल्या वर्तनाबद्दल त्यांनी समर्थांची क्षमा मागितली. त्या दोघांनी समर्थांना अत्यंत आग्रह करून भोजनास ठेवून घेतले. त्यांनी समर्थांची पूजा केली व त्यांच्याकडून अनुग्रह घेतला. यानंतर सतीबाईंनी नियमच केला की समर्थांचे दर्शन झाल्याशिवाय भोजनच घ्यावयाचे नाही. परंतु समर्थांची

नेहमी भ्रमंती चालू असे. त्यामुळे सतीबाईंना वारंवार उपास घडू लागले. एकदा तर सतत सात आठ दिवस समर्थांचे दर्शन झाले नाही. सतीबाई उपाशी अवस्थेतच समर्थांना शोधीत डोंगरावर गेल्या. तेथे त्यांना गुहेत समर्थ भेटले. समर्थांनी त्यांना तेथे जेवायला राहून घेतले. भोजन तयार करून नैवेद्य दाखविण्यापूर्वी त्यांनी सतीबाईंना पाठमोरे बसायला सांगितले, परंतु सतीबाईंनी मध्येच वळून पाहिले तो समर्थांच्या ठिकाणी त्यांना तेजस्वी मारुतीची प्रचंड मूर्ती दिसली. ते तेज त्यांना सहन न होऊन त्या मूर्च्छित पडल्या. त्या शुद्धीवर आल्यावर समर्थ त्यांना म्हणाले, "तुमच्या थोर पूर्वपुण्याईमुळे तुम्हाला आज मारुतीरायांचे दिव्य दर्शन झाले."

त्यानंतर समर्थांनी एक चुन्याची मारुतीची मूर्ती तयार केली व सतीबाईंच्याच गावात एका योग्य ठिकाणी तिची प्रतिष्ठापना केली. ते सतीबाईंना म्हणाले "तुम्हास ज्यांचे प्रत्यक्ष दर्शन झाले त्या मारुतीरायांच्या ह्या मूर्तीचे तुम्ही रोज दर्शन घ्या व भोजन करा; माझ्या दर्शनासाठी उपोषण करीत जाऊ नका."

सतीबाईंना समर्थांनी स्थापन करून दिलेली तीच ही शहापूरच्या देवळांतली मारुतीची मूर्ती.

ह्या मारुतीमंदिराची सध्याची स्थिती विशेष चांगली नाही. दर्शनोत्सुक यात्रेकरूंना मारुती मंदिराशिवाय दुसरीकडे राहाण्याउतरण्याची सोय नाही.

## ✡ श्रीक्षेत्र मसूर ✡

समर्थांच्या भ्रमणामुळे, त्यांच्या रसाळ कीर्तनांमुळे आणि त्यांच्या सिद्धिसामर्थ्यांमुळे त्यांचा शिष्यसंप्रदाय वाढत चालला. आपल्या शिष्यांना व आपल्याकडे आकर्षित होणाऱ्या लोकांना एकत्र आणून त्यांच्यांत परस्परांविषयी आत्मीयता निर्माण व्हावी म्हणून त्यांनी रामजन्माचे व हनुमानजयंतीचे उत्सव सुरू केले. अशा उत्सवांसाठी त्यांनी काही मोक्याच्या ठिकाणी मारुतीची स्थापना केली त्यांतील एक मसूरचा मारुती होय. मसूर येथील ब्रह्मपुरी भागातील कुलकर्णी घराण्याला समर्थांनी अनुग्रह दिला होता म्हणून या ब्रह्मपुरी भागातच शके १५६७/सन १६४६ मध्ये मारुतीची स्थापना केली. हा मारुती 'मसूरचा मारुती' म्हणून ओळखला जातो. त्याला 'महारुद्र हनुमान' असेही म्हणतात.



शहापूरपासून मसूर फक्त दोन अडीच मैलांवर आहे. पुणे-मिरज मार्गावर मसूर रेल्वे स्टेशन आहे. गावाजवळच दोन ओढे एकत्र येतात. ब्रह्मपुरी भाग ओढ्यापलीकडे आहे.

ही मूर्तीसुद्धा चुन्याची आहे. मूर्तीची उंची सुमारे ५ फूट आहे. मूर्ती पूर्वाभिमुख आहे. समर्थांच्या अकरा मारुतींत सर्वांत देखणी ही मूर्ती आहे. मूर्ती सुंदर रंगविलेली आहे. मूर्तीची मुद्रा सौम्य, प्रसन्न आहे, डोक्यावर सुरेख मुकुट आहे. गळ्यातील माळा, हार, जानवे, कटि-मेखला, लंगोटाचे काठ, हाताची बोटे ही सर्व बारकाव्याने रंगविलेली आहेत. मूर्तीच्या डाव्या उजव्या हाताला शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांची चित्रे काढलेली आहेत. गाभाऱ्याच्या एका भिंतीवर गाभाऱ्याचेच रंगीत चित्र आहे. देवळावर एका वृक्षाने सावली धरली आहे.

देवळाचा सभामंडप सुमारे १३ फूट लांबीरुंदीचा चौरस आहे व सहा दगडी खांबांवर आधारलेले पक्के छत आहे. देवळाशेजारीच नारायण महाराजांचा मठ आहे.

आता या देवळाचा जीर्णोद्धार श्रीरामदासस्वामी संस्थान, सज्जनगड या संस्थेने केला असून देवळाची मालकी वरील संस्थेकडे आहे. देवळाची व्यवस्था प्रतिवर्षी ह्याच संस्थेतर्फे केली जाते.

समर्थ रामदासांनी ह्या मारुतीची स्थापना केल्यानंतर सतत ४ वर्षे येथे रामनवमीचा उत्सव केला. ह्या उत्सवांपैकी एका उत्सवात समर्थांना 'कल्याण' ह्या शिष्याची प्राप्ती झाली.

'कल्याणा'चे मूळ नाव 'अंबाजी' असे होते. तो समर्थांबरोबर त्यांचा शिष्य म्हणून फिरत असे. समर्थांनी त्याची परीक्षा घ्यायचे मनात ठरविले. मसूर येथील रामनवमीच्या उत्सवाच्या मिरवणुकीत एका झाडाची एक मोठी फांदी आड येऊ लागली. समर्थांनी अंबाजीला कुऱ्हाडीने ती फांदी तोडायला सांगितली. मात्र फांदीच्या शेंड्याकडे बसून फांदी तिच्या बुंध्याकडे तोडायची अशी स्पष्ट सूचना त्याला समर्थांनी दिली व ते निघून गेले. गुरूच्या आज्ञेप्रमाणे अंबाजीने फांदी तोडली तेव्हा तो फांदीसकट तेथे खाली असलेल्या खोल विहिरीत पडला; बराच वेळ झाला तरी तो बाहेर येईना की त्याचा आवाज येईना. सर्व लोकांना काळजी वाटू लागली. समर्थांना लोकांनी हा वृत्तान्त सांगितला. तेव्हा समर्थ विहिरीजवळ आले व विहिरीत डोकावून म्हणाले, "अंबाजी, कल्याण आहे ना?" त्याबरोबर विहिरीतून उत्तर आले, "सर्व कल्याण आहे." अंबाजीची गुरुनिष्ठा कसोटीला उतरली. तेव्हापासून अंबाजीचे 'कल्याण' हेच नाव रूढ झाले.

समर्थ संप्रदायातील एक अनुयायी महाराज 'रामदासी' मसूर येथे आले असता त्यांना मारुतीरायांनी 'येथेच राहा' असा आदेश दिला. त्याप्रमाणे ते येथेच राहिले व त्यांनी देवळाची दुरुस्ती करवून घेतली व उत्सवाची शिस्त व पद्धती ठरवून दिली.

येथे चैत्र शु. १५ ला हनुमानजयंतीचा उत्सव होतो.

येथील रामदासी महाराजांच्या मठीत काही यात्रेकरूंची उतरण्याची सोय होऊ शकते. भोजनाची मात्र खास अशी सोय नाही.

### ✡ चाफळचे मारुती ✡

समर्थ रामदासांच्या जीवन-कार्यात चाफळचे महत्त्व फार मोठे आहे. समर्थांच्या चरित्राची फारशी माहिती नसलेल्या व्यक्तीलासुद्धा सज्जनगड आणि चाफळ ही नावे समर्थांच्या जीवनाशी निगडीत आहेत हे माहीत असते. चाफळचे प्रसिद्ध राममंदिर रामदासांनी शके १५६९/सन १६४८ मध्ये आपले शिष्य व गावकरी यांच्या मदतीने बांधले. प्रभु रामचंद्रांनी दिलेल्या दृष्टान्ताप्रमाणे चाफळपासून जवळच असलेल्या अंगापूरच्या डोहातली रामाची मूर्ती त्यांनी बाहेर काढली व तिची ह्या देवळात प्रतिष्ठापना केली. पंचवटीचा राम कृष्णेच्या खोऱ्यात आला आणि समर्थ संप्रदायाच्या मुख्य मठाचे स्थान चाफळ हे ठरले.

अशी आख्यायिका आहे की ज्यावेळी प्रभु रामचंद्रांनी समर्थांना अंगापूरच्या डोहातील मूर्तीविषयी दृष्टान्त दिला त्याच वेळी मारुतीनेही समर्थांना दर्शन देऊन सांगितले की ''ह्या रामाच्या समोर माझी मूर्ती स्थापन करून तू त्या मूर्तीत प्रवेश कर आणि माझी भीममूर्ती रामाच्या देवळाच्या मागे स्थापन कर.'' मारुतीच्या ह्या आदेशाप्रमाणे समर्थांनी राममंदिराच्या पुढे हात जोडून उभा असलेला 'दासमारुती' आणि मंदिराच्या मागे 'प्रतापमारुती' अशा दोन मूर्तींची स्थापना शके १५७०/सन १६४९ मध्ये केली.

### ✡ दासमारुती ✡

हा श्रीरामाच्या समोर 'दोन्ही कर जोडोनि' उभा आहे. श्रीरामासमोर नम्र हनुमंताची मूर्ती असली पाहिजे म्हणून समर्थांनी सुंदर दगडी मंदिर बांधून त्यात दासमारुतीची स्थापना केली. ही मूर्ती सुमारे ६ फूट उंच आहे. चेहऱ्यावर अत्यंत विनम्र भाव, समोर असलेल्या प्रभु श्रीरामाच्या चरणांवर विसावलेले नेत्र, अशी



ही मूर्ती आहे. तिचे अवयव रखीव व प्रमाणबद्ध आहेत. ह्या दासमारुतीसाठी समर्थांनी बांधलेले मंदिर आज सुमारे सव्वातीनशे वर्षांनंतरही उत्तम स्थितीत आहे. १९६७ सालच्या भूकंपातही ह्या मंदिरास कोठे धक्का लागला नाही, साधा तडाही गेला नाही. राममंदिराचे मात्र ह्या भूकंपाने मोठे नुकसान झाले, त्यामुळे त्याचा आता कायाकल्प केला गेला आहे. परंतु ह्या कायाकल्पांतही दासमारुतीच्या मूर्तीत किंवा मंदिरात काहीही बदल केलेला नाही. समर्थकालीन सर्व शिल्प व वास्तू कायम ठेवण्यात आली आहे.

### ✡ प्रतापमारुती ✡

श्रीराम मंदिराच्या मागे सुमारे तीनशे फूट अंतरावर प्रतापमारुतीचे मंदिर आहे. ह्या मारुतीला 'भीममारुती', 'प्रताप-मारुती' किंवा 'वीर मारुती' अशी तीन नावे आहेत. ते मंदिरदेखील जसे समर्थांनी बांधले त्याच स्थितीत आहे. ह्या मंदिराला ५० फूट उंच शिखर आहे. त्या शिखराचे शिल्पकाम उत्कृष्ट आहे. प्रताप-मारुतीची उंची सुमारे सात-आठ फूट आहे. मूर्ती अत्यंत भव्य, उंच व रेखीव आहे. 'भीमरूपी महारुद्रा' ह्या स्तोत्रात समर्थांनी वर्णन केल्याप्रमाणे 'पुच्छ माथा मुरडिले' आहे. मस्तकावर मुकुट, कानात कुंडले आहेत. कटिभोवती सुवर्णाची कासोटी व तिला रुणझुण करणाऱ्या घंट्या आहेत. टकाराचे ठाण मांडून बसलेली ही मूर्ती नेटकी व सडपातळ आहे. समर्थांनी आपल्या विशिष्ट शैलीत ठसकेबाज वर्णन केलेली ही मूर्ती पुण्यवान भक्तांना 'परितोषविणारी' व दुष्टांना 'काळाग्नी व काळरुद्राग्नी' सारखी भसते. ती नेत्रातून जणु काय अग्निवर्षाव करीत आहे अशी भासते. काळालाही कंपित करील असे हिचे रूप आहे. ही मूर्ती महाविद्युल्लतेप्रमाणे तेजस्वी आहे. चाफळ मठात वास्तव्य असले की समर्थ ह्या मूर्तीच्या चरणतलाशी बराच वेळ बसून समोर असलेल्या बकुलवृक्षावरील वानरांच्या लीला पाहात राहात. चाफळ गावावर आलेले कोणतेही दैवी संकट ह्या मूर्तीच्या पूजेने दूर होते अशी त्या भागांतील भाविक जनतेची श्रद्धा आहे.

प्रतिवर्षी श्रावण महिन्यात ह्या महारुद्र मूर्तीला महारुद्राभिषेक करण्यात येतो व त्या अनुष्ठानाची सांगता श्रावण वद्य ३०ला यथासांग साजरी केली जाते. हनुमान जयंतीचा उत्सव तर अत्यंत थाटाने होतोच.

चाफळ येथील मारुतीच्या ह्या दोन्ही मूर्तींच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची येथील मंदिराजवळील मठात राहाण्या-झोपण्याची चांगली व्यवस्था होते.

## ✡ श्रीक्षेत्र शिंगणवाडी ✡

चाफळच्या नैऋत्येस सुमारे अर्ध्या मैलावर शिंगणवाडीची टेकडी आहे. शिंगणवाडीला सिंगणवाडी किंवा सिंघणवाडी अशीही नावे आहेत. तेथील गुहेत समर्थ रामदास जपजाप्य करायला जात म्हणून त्यांनी आपल्या आराध्य दैवताची म्हणजेच मारुतीची मूर्ती तयार करून तिची स्थापना येथे केली. चाफळच्या दोन मारुतीच्या स्थापनेमागोमागच, म्हणजे शके १५७१/सन १६५० मध्ये, ह्या मूर्तीची स्थापना झाली असावी असे मानले जाते. चाफळ येथे मुख्य मठ स्थापन करण्यापूर्वी समर्थांचा मठ येथे होता. शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांची भेट झाली ती ह्या मठालगतच्या बागेतील एका शेवरीच्या वृक्षाखाली झाली. (काहींच्या मते तेथील एका चिंचेच्या वृक्षाखाली ही भेट झाली.) ह्या भेटीच्या वेळी शिवाजी महाराजांकडून गुरुदक्षिणेदाखल मिळालेले होन समर्थांनी तेथे जमलेल्या लोकांवर उधळले व त्यातील काही नाणी अगदी परवा-परवांपर्यंत ह्या परिसरात सापडत असे म्हणतात.

येथून जवळच 'रामघळ' हे समर्थांचे चिंतनाला बसण्याचे ठिकाण आहे. तसेच शिवाजी महाराजांची तहान भागविण्यासाठी समर्थांनी आपल्या कुबडीने दगड उलथून दगडाखाली पाण्याचा जो झरा दाखविला तो 'कुबडीतीर्थ' म्हणून ओळखला जाणारा झरादेखील येथून जवळच आहे.

शिंगणवाडीच्या टेकडीवरील ह्या मारुतीला 'खडीचा मारुती' अथवा 'बालमारुती' असे म्हणतात. सुमारे ६ फूट लांबीरुंदीच्या देवळात साडेतीन फूट उंचीची ही मूर्ती उत्तरेकडे तोंड करून उभी आहे. ह्या मारुतीच्या डाव्या हातात त्रिशुळासारखी वस्तू आहे. ती बहुधा भगवी ध्वजा असावी. चाफळचा प्रतापमारुती व पारगावचा मारुती यांच्या डाव्या हातातही अशीच ध्वजा आहे. दुसरा हात उगारलेला आहे. या मारुतीस सभामंडप नाही. मात्र देवळासमोरच्या जागेत सावली देणारे वृक्ष आहेत. देवळाचा परिसर आल्हाददायक व पवित्र वाटतो. टेकडीच्या पश्चिमेकडून ओढा वाहातो, त्याच्या काठीही गर्द झाडी आहे. अकरा मारुतीत हे देऊळ सर्वात छोटे आहे.

हे मंदिर उंचावर आहे व त्याच्या शिखराला तांबडा रंग दिलेला आहे, त्यामुळे चाफळच्या परिसरातून कुठूनही दिसते. दुरून पाहाणाऱ्याला एखादा दर्गा किंवा मशीदच असावी असे वाटते.



ह्या मारुतीची स्थापना चाफळच्या मारुतींच्या मागोमागच झाल्यामुळे व चाफळापासून फारच जवळ हा मारुती असल्यामुळे काही लोक ह्याला चाफळचाच तिसरा मारुती समजतात.

ह्या मारुतीची पूजा-अर्चा व हनुमानजयंतीचा उत्सव ह्याबाबतची सर्व व्यवस्था चाफळच्या श्रीराम देवस्थानांकडून केली जाते.

अलीकडे शिंगणवाडीचे लोक हनुमानजयंतीचा उत्सव साजरा करतात व त्या दिवशी भंडारा घालतात.

## ✡ श्रीक्षेत्र उंब्रज ✡

समर्थ रामदासस्वामी चाफळहून रोज उंब्रज येथे स्नानाला जात, म्हणून येथील मारुतीची स्थापना झाली असावी. मंदिराच्या जवळ कृष्णा नदीचा घाट आहे. कृष्णा नदीत स्नान करायचे व मग ह्या मारुतीच्या मूर्तीची पूजा करायची असा समर्थांचा नित्यक्रम असे.

ह्या मूर्तीची स्थापना शके १५७१/सन १६५० मध्ये झाली. ह्या मूर्तीच्या स्थापनेनंतर समर्थांनी सतत तेरा दिवस कीर्तन केले व नंतर त्यांना शिराळे येथील देशपांडे घेऊन गेले असा 'विश्रामधामात' उल्लेख आहे.

समर्थांना शके १५७० मध्ये उंब्रजमध्ये काही जमीन इनाम म्हणून मिळाली होती. त्यामुळे त्यांनी येथे मारुती मंदिर व त्यापाठोपाठ मठही स्थापन केला.

उंब्रज हे मसूरच्या पश्चिमेस चार मैलांवर आहे. उंब्रज व मसूर यांच्यामधून कृष्णा नदी वाहाते. पुणे बंगलोर महामार्ग उंब्रजमधून जातो.

येथील मारुतीचे देऊळ पूर्वाभिमुख आहे. देवळाचा परिसर आकर्षक वाटत नसला तरी मूर्ती चांगली आहे. हा मारुती समर्थांच्या अकरा मारुतीत सर्वांत वयाने लहान, 'बालमारुती' वाटतो. ह्या मूर्तीला चांदीचे डोळे आहेत. ह्या मूर्तीची उंची सुमारे ६ फूट आहे. ही मूर्ती चुना, वाळू व ताग ह्या त्रिभागापासून बनविलेली आहे. ह्या मारुतीला 'उंब्रजचा मारुती' किंवा 'मठातील मारुती' अशी नावे आहेत. ह्या मंदिराला कळस नाही. मंदिराच्या नावाचा फलक नाही. मंदिर चांगले आहे. मंदिर पूर्वाभिमुख आहे. परंतु मंदिराचा प्रवेश उत्तरेकडून आहे.

ह्या मंदिराच्या संबंधात दोन आख्यायिका आहेत. पहिली आख्यायिका अशी की एके दिवशी स्नान करीत असताना समर्थ 'बुडालो, बुडालो' असे ओरडले. प्रवाहात खालच्या बाजूस स्नान करीत असलेल्या शिष्यमंडळींची गडबड उडाली. शिष्यमंडळी मदतीला येण्यापूर्वीच मारुतीरायांनी खडकावरून

नदीच्या पात्रात उडी मारली व समर्थांना बाहेर काढले. "श्रीरामांनी तुझा सांभाळ करण्याची मला आज्ञा केली आहे" असे समर्थांना मारुतीराय म्हणाले. खडकावरून जेथून मारुतीरायांनी उडी मारली तेथे मारुतीरायांचे पाऊल उमटलेले आहे. सध्या मात्र ते वाळूखाली बुजले आहे.

दुसरी आख्यायिका अशी की एक ब्राह्मण समर्थांचा शिष्य बनून त्यांच्या बरोबर राहात होता. त्याला वाटले की आपल्याला मठात आरामात राहायला मिळेल. परंतु समर्थ त्याला आपल्याबरोबर जेव्हा जिकडे तिकडे हिंडवू लागले तेव्हा तो कंटाळला व समर्थांना सोडून तुकारामबुवांकडे आला. तो तुकारामबुवांकडे अनुग्रह मागू लागला. तेव्हा तुकारामबुवांनी पूर्वी कोणाचा अनुग्रह घेतला होता काय अशी चौकशी केली. त्याने आपण समर्थांचा अनुग्रह घेतला होता पण तो सोडून आलो आहोत असे तुकारामबुवांना सांगितले. तुकारामबुवा म्हणाले. 'समर्थांकडे जा व त्यांचा अनुग्रह परत करून ये." तो ब्राह्मण समर्थांकडे गेला व अनुग्रह परत घेण्याची त्यांना विनंती करू लागला. समर्थांनी त्याला सांगितले, "पाण्याची एक चूळ भरून व अनुग्रहांचा मंत्र म्हणून त्या समोरच्या खडकावर टाक, म्हणजे अनुग्रह परत केल्यासारखे होईल." त्या ब्राह्मणाने चूळ भरून खडकावर टाकली तेव्हा तेथे रामाच्या त्रयोदशाक्षरी मंत्राची 'श्रीराम जय राम जय जय राम' ही अक्षरे उमटली. त्याच क्षणी त्या ब्राह्मणाची वाचाही गेली. तो अत्यंत दुःखी होऊन पुन्हा तुकारामबुवांकडे आला. तेव्हा त्याची दया येऊन तुकारामबुवा त्याला घेऊन समर्थांकडे आले व त्याची वाचा परत करण्याविषयी त्यांनी समर्थांकडे रदबदली केली. तेव्हा समर्थांनी त्या ब्राह्मणाला सांगीतले, "खडकावर उमटलेली ती त्रयोदशाक्षरी मंत्राची अक्षरे चाट, म्हणजे तुझी गेलेली वाचा परत येईल." त्या ब्राह्मणाने तसे केल्याबरोबर त्याची वाचा त्याला परत मिळाली.

हनुमानाचे पाऊल आणि खडकावर उमटलेली त्रयोदशाक्षरी मंत्र ह्या दोहांच्या खुणा अजून तेथे आहेत. मात्र सध्या पात्रात बरीच वाळू वाहून आलेली असल्यामुळे त्या वाळूखाली बुजल्या गेल्या आहेत. त्या दोहोंपैकी एक खूण रामकड्याखाली होती व दुसरी खूण येथील आद्य मठपती केशवस्वामी यांच्या समाधीसमोर होती.

येथे केशवस्वामींची पुण्यतिथी सर्वपित्री अमावास्येस साजरी केली जाते.चैत्र शुद्ध १५ ह्या दिवशी हनुमान जयंतीचा उत्सव मोठ्या थाटात साजरा



केला जातो. हनुमानजयंतीच्या आदल्या दिवशी 'साप्रंदायिक भिक्षे'चा कार्यक्रम होतो. येथील मठपती हनुमानजयंतीच्या उत्सवाच्या दिवशी अन्नदानाचीही व्यवस्था करतात.

## ✡ श्रीक्षेत्र माजगाव ✡

चाफळहून उंब्रजकडे जाताना पूर्वेस सुमारे दीड मैलावर माजगाव येते.

असे म्हणतात की ह्या गावच्या शिवेवर साधारण घोड्याच्या आकाराचा एक मोठा धोंडा होता. लोक त्या धोंड्यालाच ग्रामरक्षक मारुती म्हणून पूजीत असत. एकदा समर्थ त्या गावी गेले असता त्यांना गावकऱ्यांनी तो धोंडा दाखविला व "तुमच्या पवित्र हातांनी ह्या मारुतीची प्रतिष्ठापना व्हावी" अशी विनंती केली. गावकऱ्यांची ही श्रद्धा पाहून समर्थांनी त्या धोंड्यावर मारुतीची प्रतिमा कोरून घेतली व शके १५७१/सन १६५० मध्ये त्या मारुतीची उत्सवपूर्वक स्थापना केली व तेथे देऊळही उभे केले.

सध्या तिथे दिसणारे मारुतीचे देऊळ श्रीधरस्वामींनी बांधलेले आहे असे म्हणतात. ह्या देवळाची किंवा मूर्तीची सध्याची स्थिती चांगली नाही. मूर्ती ओबडधोबड वाटते. मूर्ती सुमारे ५ फूट उंचीची आहे. मूर्तीची पूजादेखील नीट होत नसावी असे वाटते.

मारुतीच्या मूर्तीचे तोंड पश्चिमेला म्हणजे चाफळच्या रामाकडे आहे. देवळाच्या पूर्वकडील भिंतीवर बाहेरच्या बाजूस आकाशोड्डाण करणाऱ्या हनुमंताचे चित्र काढलेले आहे ते चांगले दिसते.

मूळचे देऊळ आठ फूट औरसचौरस आहे. जीर्णोद्धाराच्या वेळी ह्या मंदिराभोवती मोठा सभामंडप बांधला गेला.

मंदिर कौलारु आहे. मंदिर माती व विटांचे आहे. मंदिराजवळ ध्वज नाही. जमिनीला फरशी नाही. मंदिरास धड दार नाही. रंगकाम नाही, स्वच्छता नाही. वीज आहे परंतु बिल भरले न गेल्यामुळे वीज तोडली गेल्याचे प्रकार घडलेले आहेत. देवापुढे दिवा लावण्यास आवश्यक तेलही पुरेसे मिळते असे नाही. तसेच शेंदूरही पुरेसा मिळत नसावा. चाफळच्या श्रीरामदेवस्थानाकडे ह्या मारुतीदेवस्थानाची व्यवस्था आहे असे कळते.

यात्रेकरूच्या राहाण्याजेवण्याची काही खास सोय येथे नाही. अर्थात मंदिराच्या सभामंडपात रात्र काढता येण्यासारखी आहे.

'माजगावचा मारुती' ह्याच नावाने हा मारुती ओळखला जातो.

## ✡ श्रीक्षेत्र बहे-बोरगाव ✡

बहे (किंवा बाहे) वाळवे तालुक्यात कृष्णा नदीच्या काठी बोरगावजवळ आहे, म्हणून त्याचा उल्लेख बहे-बोरगाव असा केला जातो.

बहे येथील नदीच्या प्रवाहात एक बेट आहे. त्याचे नाव 'रामलिंग'. या बेटावर एक प्राचीन राममंदिर आहे. रामाच्या पुढ्यात शिवलिंग आहे. ह्या बेटावर राममंदिराच्या मागे मारुतीची मूर्ती स्थापन केलेली आहे. ह्या मारुतीचे हात कृष्णेचा प्रवाह अडविण्याच्या पवित्र्यात, मांड्याच्या दोन्ही बाजूस धरलेले असे आहेत. डोक्यावर उंच मुकुट आहे. ही मूर्ती भव्य, भीममूर्ती आहे. रंगीत आहे. समर्थांनी ह्या मूर्तीची स्थापना शके १५७३/सन १६५२ मध्ये केली असे मानले जाते.

ह्या मूर्तीच्या स्थापनेबद्दल मोठी मनोरंजक आख्यायिका आहे. रावणवध करून सीतेसह परत येत असताना रामलक्ष्मणांनी बहे या गावी मुक्काम केला सीतामाईंना त्यांनी गावात ठेवले व ते कृष्णेच्या प्रवाहात स्नानासाठी आले. श्रीरामचंद्रांनी स्नान केले व तेथे शिवलिंगाची पूजा करण्यात गढले असता कृष्णेला उल्लास येऊन तिचा प्रवाह एकदम वाढू लागला. मारुतीरायांनी श्रीरामचंद्रांच्या मागे उभे राहून दोन्ही हातांनी कृष्णेचा प्रवाह अडविला व कृष्णेला "दोन बाजूनी वाहा" असे सांगितले. मारुतीने कृष्णेचा प्रवाह थांबविल्यामुळे तेथे बेट तयार झाले व डोहही तयार झाला. मारुतीच्या बाहूंमळे कृष्णेचे झालेले दोन प्रवाह पुढे जाऊन पुन्हा एकत्र आले. अशा तऱ्हेने प्रभु रामचंद्रांच्या ध्यानात येऊ घातलेले विघ्न दूर झाले. दोन्ही बाजूंनी प्रवाह पुढे गेल्यामुळे ह्या स्थानाचे नाव (बाहे) असे पडले.

श्रीसमर्थ रामदास येथे आले तेव्हा लोकांकडून ही हकीगत त्यांना कळली. ह्या ठिकाणी प्रभु रामचंद्रांचा काही काळ वास झाला होता तेव्हा येथे मारुती असणारच असे समर्थांनी मानले. मारुती डोहात बुडी मारून बसला आहे असे गावकरी म्हणत. समर्थांनी डोहात बुडी मारली. काही प्रहर ते डोहात होते असे म्हणतात! समर्थांनी डोहातून मारुतीची मूर्ती बाहेर काढली. परंतु तेव्हा मारुतीला दाखवावयाच्या नैवेद्याची, पूजेची वगैरे तयारी गावकऱ्यांकडून झाली नव्हती. तेव्हा मारुतीरायांनी समर्थांना सांगितले की, "सांप्रतकाळी बाहेर राहाणे योग्य होणार नाही." असे सांगून मारुतीराय डोहात पुन्हा लुप्त झाले. समर्थांनी



मारुतीरायांचे ते रूप आठवून दुसरी मूर्ती तयार केली. स्नान करून तिची पूजा केली व रामाच्या मागे तिची स्थापना केली.

ह्या मूर्तीच्या स्थापनेपूर्वी मारुतीचे ध्यान करताना समर्थांनी मारुतीचे एक भीमरूपी स्तोत्र रचले आहे. समर्थांच्या भीमरूपी स्तोत्रांतील सर्वांत मोठे असे हे स्तोत्र आहे. ते स्तोत्र भक्तिरसाने व वीररसाने भरलेले आहे.

समर्थ-स्थापित अकरा मारुतींत पर्यटन-स्थळ म्हणता येण्यासारखे हेच एक स्थान आहे. हे ठिकाण निसर्गरम्य आहे. येथे कृष्णा नदीवर मोठा पूल आहे. पुलाच्या पश्चिमेस नदीवर बंधारा आहे. ह्या बंधाऱ्यावरून नदीच्या पात्रांतील खडकांवर जाता येते. वाट खडका खडकावरून मारुती-मूर्ती असलेल्या बेटाकडे गेली आहे. नदीला पूर आला असेल तेव्हा या बेटांवर जाता येत नाही. म्हणून पावसाळ्यात येथील पुजारी बेटावरच जाऊन राहातात. बेटावर मारुती मंदिराशिवाय इतरही बेटे व समाध्या आहेत. मच्छिंद्र किल्ला येथून जवळच दिसतो. कृष्ण-माहात्म्यात ह्या क्षेत्राचा उल्लेख 'बाहुक्षेत्र' असा आढळतो.

## ✡ श्रीक्षेत्र मनपाडळे ✡

मनपाडळे हे समर्थांच्या अकरा मारुतीस्थानांपैकी सर्वांत दक्षिणेकडचे स्थान. ज्योतिबाचा डोंगर आणि पन्हाळगड येथून जवळ आहेत. पन्हाळगड किल्ल्याचे राजकीय महत्त्व लक्षात घेऊन समर्थ रामदासांनी येथे शिष्यसंप्रदाय वाढविला असावा व ह्या मूर्तीची स्थापना केली असावी. ज्योतिबा हे ज्योतिर्लिंग देवस्थान येथून जवळ आहे. तेव्हा अशा पवित्र ठिकाणी मारुतीमंदिर असावे अशा भावनेनेही कदाचित ह्या मारुतीची स्थापना समर्थांनी केली असेल. स्थापना शके १५७३/सन १६५२.

हे मारुतीमंदिर अगदी एका टोकावर नदीच्या काठी आहे. मंदिर कौलारू आहे. मंदिराजवळून ओढा वाहतो. मंदिराच्या आसपास झाडी आहे. मंदिराचा गाभारा ७ फूट × ६ फूट असून त्या भोवती २६ फूट × १५ फूट असा सभामंडप आहे. सभामंडपाचे बांधकाम नवीन आहे व चांगल्या स्थितीत ठेवलेले आहे.

मंदिर व आतील मारुतीची मूर्ती उत्तराभिमुख आहे. मूर्ती सुमारे ५॥ फूट उंचीची आहे. मूर्ती साधी परंतु सुबक आहे. मूर्तीजवळ सुमारे दीड फूट उंचीची कुबडी आहे.

येथे अगदी जवळ पाडळी नावाचे गाव आहे. तेथेही मारुतीची मूर्ती आहे. येथे मुख्य उत्सव दासनवमीचा असतो.

येथे दर्शनासाठी येणाऱ्या लोकांची मंदिराच्या मंडपात राहाण्या उतरण्याची सोय होऊ शकते. भोजनाची मात्र खास व्यवस्था नाही.

## ✫ श्रीक्षेत्र पारगाव ✫

पारगाव हे मनपाडळे ह्या मारुती-देवस्थानापासून सुमारे पाच मैलांवर आहे. मात्र ह्या दोन देवस्थानांना जोडणारा थेट एस.टी. चा रस्ता नाही. कऱ्हाड-कोल्हापूर रस्त्यावरील वाठार ह्या गावापासून वारणा साखरकारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर नवे पारगाव आहे व त्याच्या उत्तरेस दोन मैलांवर जुने पारगाव आहे ह्या जुन्या पारगावचा मारुती हाच समर्थ स्थापित 'पारगाव' चा मारुती. ह्या मूर्तीची स्थापना शके १५७४/सन १६५३ मध्ये झाली असावी असे मानले जाते. पारगाव हे सुद्धा पन्हाळ गडाजवळचेच गाव असल्यामुळे समर्थांनी त्याचे राजकीय महत्त्व लक्षात घेऊन बहुधा येथे मारुतीमूर्तीची स्थापना केली असावी. अनाजी दत्तो व कोंडाजी फर्जंद यांना शिवाजी महाराजांनी पन्हाळ्याची मोहीम सांगितली तेव्हा राजकीय खलबतांसाठी शिवाजी महाराज व समर्थ रामदास हे दोघे ह्या पारगावी येत असत असे म्हणतात.

समर्थांनी स्थापिलेल्या अकरा मारुतीतला हा मारुती शेवटचा असे मानले जाते. अकरा मारुतींपैकी ही सर्वात लहान मूर्ती आहे. काहींचे म्हणणे असे की समर्थांनी अकरा मारुतींच्या मूर्ती एका रात्रीत तयार केल्या. त्या करता करता उजाडू लागले म्हणून समर्थांनी ही शेवटची मूर्ती लहान केली. त्या मूर्तीची उंची फक्त दीड फूट आहे. इतर मारुतींप्रमाणे ही मूर्ती शेणाची किंवा चुनामातीची नाही. एका सपाट दगडावर ही मूर्ती कोरलेली आहे. मूर्तीवर शेंदूरही चढविलेला नाही. या मारुतीने केसांची शेंडी बांधलेली आहे . तो डावीकडे तोंड करून धावत निघालेला आहे. समर्थांच्या इतर मूर्तीहून ही मूर्ती इतकी निराळी आहे की ही मूर्ती समर्थांची नव्हेच अशी शंका यावी.

ह्या मंदिराची मूळ घुमटी ८ फूट लांबरुंद आहे. त्याभोवती १९७२ साली ४० फुट × १६ फूट असा सभामंडप बांधला गेला. परंतु हे बांधकाम बाहेरून देऊळ न वाटता एखाद्या हॉलसारखे वाटते. ह्या देवळाच्या भिंतीवर देवळाचा नामफलक नाही, ध्वजही नाही. देवळात पुरेशी स्वच्छता आढळत नाही.

यात्रेकरूंची राहाण्याजेवण्याची सोय येथे नाही.



## ✫ श्रीक्षेत्र शिराळे ✫

नागपंचमीच्या दिवशी होणाऱ्या व गारुड्यांच्या व नागांच्या खेळासाठी प्रसिद्ध असलेले जे बत्तीस-शिराळे नावाचे गाव, तेच हे शिराळे.

शिराळे येथील महादजी साबाजी देशपांडे हे समर्थांचे शिष्य बनले होते. त्यांच्या आग्रहास्तव समर्थांनी शके १५७६/सन १६५५च्या सुमारास येथील मारुतीची स्थापना केली. पूजेअर्चेची जबाबदारी देशपांडे यांच्यावर सोपविली.

अकरा मारुतींच्या देवळांत सर्वांत सुरेख देऊळ शिराळ्याच्या मारुतीचे असे काही लोक मानतात. देवळाचा वरचा कळस फार चांगला रंगविला आहे. समर्थांनी मुळात एक कमान बांधून तीत मारुतीची स्थापना केली होती. नंतर त्यांचे शिष्य जयरामस्वामी यांनी कौलारू मंदिर बांधले. सुमारे शंभर वर्षांपूवी जठार नावाच्या मारुतीभक्त मामलेदारांनी दगडी देऊळ बांधून घेतले. सुमारे तीन वर्षांपूर्वी सध्याच्या ट्रस्टींनी कळस, मंडप वगैरेंची दुरुस्ती करून घेतली. भक्तमंडळींनीही ह्या दुरुस्ती खर्चास हातभार लावला.

हे देऊळ उत्तराभिमुख आहे व मूर्तीचे तोंडही उत्तरेकडे आहे. ही वीरमारुतीची मूर्ती आहे. तिची उंची सुमारे सात फूट आहे. मूर्तीच्या कंबरपट्यांतल्या घंटा कटिवस्त्र व त्यांचा गोंडा सुरेख चितारलेला आहे. मूर्तीच्या मस्तकाच्या डाव्या उजव्या बाजूला झरोके आहेत. त्यातून त्या वायुपुत्राभोवती सतत हवा खेळती राहाते. सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी ह्या झरोक्यांतून मूर्तीवर प्रकाश पडतो व ते दृश्य फार सुंदर दिसते. ही मूर्ती उत्तम चुन्याची बनविलेली आहे.

ह्या देवळाला दक्षिणेच्या दिशेलाही एक प्रवेशद्वार आहे. देवळात वीज आहे देवळाजवळ ओढा वाहतो. सभामंडप २२ फूट लांब व १७ फूट रुंद आहे.

देऊळ एस.टी. स्टँडजवळ आहे. यात्रेकरूंना देवळाच्या सभामंडपात मुक्काम करता येतो.

मारुतीच्या पूजेची व्यवस्था तसेच उत्सवाची व्यवस्था प्रत्येक वर्षी देशपांडे कुटुंबीयांपैकी एकेकाकडे वाटून दिलेली आहे. ज्याच्याकडे व्यवस्था असेल त्याला 'वर्षलदार' अशी संज्ञा आहे.

येथे चैत्र शु. १५ ह्या दिवशी हनुमानजयंतीचा उत्सव होतो. कीर्तन जन्मकाळ, भंडारा यांच्यायोगे हा उत्सव साजरा केला जातो.

✲✲✲

# अकरा मारुतींचे दर्शन करणाऱ्यांसाठी काही उपयुक्त अंतरे

| | कि. मी. |
|---|---|
| सातारा ते कोल्हापूर | १२४ |
| सातारा ते उंब्रज | ४० |
| उंब्रज ते माजगाव | ८ |
| उंब्रज – माजगाव – चाफळ | ११ |
| उंब्रज ते मसूर | ९ |
| उंब्रज – मसूर – शहापूर | १२ |
| उंब्रज ते कराड | १४ |
| सातारा ते कराड | ५४ |
| कराड ते पेठ | २६ |
| कराड ते कोल्हापूर | ७० |
| पेठ ते शिराळा | १५ |
| पेठ – इस्लामपूर – बहे | २२ |
| पेठ – तांबवे – बहे | २२ |
| पेठ ते वडगाव ( वाठार ) | २२ |
| वडगाव ( वाठार ) ते पारगाव | १४ |
| वडगाव ( वाठार ) – अंबप – मनपाडळे | १४ |
| वडगाव ( वाठार ) ते कोल्हापूर | २२ |